# विदर्भ प्रजासत्ताक

RNI No. - MAHMAR 2023/84526

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com

❑ वर्ष - १ ❑ अंक -२७७ ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि.९ जानेवारी २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## ‘मोदी की गॅरंटी’ची देशातच नव्हे, तर जगभरात खूप चर्चा : पंतप्रधान नरेंद्र मोदींचे विधान

**दि.९विदर्भ प्रजासत्ताक नवी दिल्ली**

‘विकास भारत संकल्प यात्रा’ ही केवळ सरकारचीच नव्हे तर देशाची यात्रा झाली आहे. गरीब, शेतकरी, महिला आणि तरुण सक्षम झाले तरच देश शक्तिशाली होईल, असे पंतप्रधाननरेंद्र मोदी यांनी सोमवारी सांगितले. पूर्वीच्या सरकारांमध्ये शेतकऱ्यांना सक्षम करण्याची चर्चा केवळ शेतमालाचे उत्पादन आणि विक्री यापुरतीच मर्यादित होती, मात्र सध्याचे केंद्र सरकार लहान शेतकऱ्यांना संकटातून बाहेर काढण्यासाठी सतत काम करत आहे, असे ते म्हणाले.



२ कोटी पेक्षा गरीब लोकांच्या आरोग्याची तपासणी ‘विकास भारत संकल्प यात्रे’दरम्यान करण्यात आली.
१कोटी लोकांची टीबी आजाराचीही तपासणी करण्यात आली.
२२ लाख लोकांची सिकलसेल, निमियाची चाचणी करण्यात आला.
५० दिवस यात्रेला पूर्ण
११ कोटी लोक या यात्रेत सहभागी
१० वर्षांत १० कोटी महिला बचत गटांमध्ये सहभागी

### प्रत्येक शेतकऱ्याला केंद्र सरकारने दिले किमान ३० हजार रुपये

पंतप्रधान म्हणाले की आधीच्या सरकारांच्या काळात शेतकऱ्यांना दैनंदिन जीवनात अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत होते. त्यामुळे शेतकऱ्यांची प्रत्येक अडचण दूर करण्यासाठी आमच्या सरकारने सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत.

पीएम किसान सन्मान निधीच्या माध्यमातून प्रत्येक शेतकऱ्याला किमान ३०,००० रुपये देण्यात आले आहेत. मोदी म्हणाले की, त्यांच्यासाठी गरीब, शेतकरी, महिला आणि तरुण या चार सर्वात मोठ्या जाती आहेत आणि जेव्हा त्यांना सशक्त केले जाईल, तेव्हा मजबूत भारत तयार होईल.

मोदींनी ‘विकास भारत संकल्प यात्रे’च्या लाभार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी पंतप्रधान म्हणाले की, पात्र व्यक्ती कोणत्याही सरकारी योजनेच्या लाभापासून वंचित राहू नये हा ‘मोदीची गॅरंटी’च्या या यात्रेचा उद्देश आहे. अनेक वेळा जनजागृतीअभावी काही लोक सरकारी योजनांच्या लाभापासून वंचित राहतात. अशा लोकांपर्यंत पोहोचणे ही सरकारची जबाबदारी आहे. आज मोदींच्या गॅरंटीची देशातच नव्हे तर जगात खूप चर्चा होत आहे, असे ते म्हणाले.

### आधीच्या पिढ्यांनी जे भोगले...

मोदी म्हणाले, ‘आधीच्या पिढ्यांनी जे जीवन जगले ते आताच्या आणि भावी पिढ्यांनी जगू नये, अशी आमची सरकारची इच्छा आहे.

देशाच्या मोठ्या लोकसंख्येला छोट्या छोट्या दैनंदिन गरजांच्या संघर्षातून बाहेर काढायचे आहे.

यात्रा सुरू झाल्यापासून उज्ज्वला कनेक्शनसाठी १२ लाख नवीन अर्ज आले आहेत आणि सुरक्षा विमा योजना, जीवन ज्योती योजना, प्रधानमंत्री स्वनिधीसाठी लाखो अर्ज आले आहेत.

आज डॉक्टर गरीब, दलित, वंचित आणि आदिवासींच्या दारापर्यंत पोहोचत आहेत, जे पूर्वीच्या सरकारांनी आव्हान मानले होते.’

### श्रीराम सर्वांचे, निमंत्रण मिळाले तर जाणार : नितीश कुमार

**दि.९विदर्भ प्रजासत्ताक अयोध्या**

अयोध्येतील राम मंदिरात रामलला प्राणप्रतिष्ठा सोहळ्याची जय्यत तयारी सुरू आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह सुमारे ७ ते ८ हजार मान्यवरांना निमंत्रण देण्यात आले आहे. मात्र, राम मंदिरावरून तसेच निमंत्रणे देण्यावरून विरोधक केंद्र सरकारवर टीका करताना दिसत आहेत. राम मंदिराच्या सोहळ्याला जायचे की नाही, यावरून विरोधकांच्या इंडिया आघाडीमध्ये संभ्रम आहे. यातच बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या जयदू पक्षातील मंत्र्यांनी मात्र वेगळी भूमिका घेतली असून, निमंत्रण दिल्यास राम मंदिर सोहळ्याला जाणार असल्याचे म्हटले आहे.

## निवडणूक लढणार नाही हे आता ठरवलेय,शरद पवारांचे मोठे विधान

**दि.९विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

आगामी लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर विरोधकांची इंडिया आघाडी जोरदार प्रयत्न करत आहे. जागावाटपावरून इंडिया आघाडीचे एकमत होताना दिसत नाही. राज्यातही महाविकास आघाडीमध्ये जागावाटपावरून धुसपूस असल्याची चर्चा आहे. यातच राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडून शरद पवार यांच्या वयाचा उल्लेख करत टीका केली जात आहे. यासंदर्भात बोलताना शरद पवार यांनी मोठे विधान केले आहे. आता निवडणूक लढणार नाही, हे मी आता ठरवले आहे, असे शरद पवार यांनी म्हटले आहे.

पत्रकार परिषदेत बोलताना शरद पवार यांनी अनेक विषयांवर भाष्य केले. आमदार अपात्रता प्रकरण, बिलकिस बानो प्रकरण, आगामी लोकसभा निवडणुका, महाविकाससह इंडिया आघाडीची रणनीति अशा अनेकविध मुद्द्यांवर प्रतिक्रिया दिली. अजित पवार यांच्याकडून शरद पवारांच्या वयाचा उल्लेख वारंवार केला जातो. त्यावरून टीकाही केली जाते. तुम्ही आता आशिर्वाद द्या. मार्गदर्शन करा. साथ द्या, अशी साद अजित पवार गटातील



नेते शरद पवार यांना घालतात. याबाबत विचारलेल्या प्रश्नांवर शरद पवार यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले.

**निवडणूक लढणार नाही हे आता ठरवले आहे**

खासदारकीची सध्याची टर्म संपल्यानंतर मी निवडणूक लढवणार नाही. माझी खासदारकी अडीच वर्षांनंतर संपत आहे. त्यानंतर निवडणूक लढणार नाही हे ठरवले आहे. माझी खासदारकीची टर्म शिल्लक आहे. त्यामुळे तोपर्यंत काम करत राहणार आहे. मला लोकांनी तिथे पाठवले आहे. तिथे काम करु नको का? १९६७ पासून राजकारणात आहे . माझ्या विरोधकांनीही कधी वयावरून टीका केली नाही. अनेक संस्थांचा आजीवन अध्यक्ष आहे . तिथे मी काम करत राहणार आहे, असे शरद पवारांनी म्हटले आहे.

दरम्यान, अयोध्येतील राम मंदिराचा भव्य सोहळा आणि जितेंद्र आव्हाड यांनी केलेल्या विधानावर प्रतिक्रिया देताना शरद पवार म्हणाले की, राम श्रद्धेचा विषय आहे. पक्षांकडून रामाबाबत कोणतेही विधान करण्यात आलेले नाही. जितेंद्र आव्हाड यांचे वक्तव्य पक्षाचे विधान नाही. मुंबईचे पालकमंत्री शाळांमध्ये रामाबाबत स्पर्धा घेण्यासाठी सक्ती करत आहेत हे योग्य नाही. हा सेक्युलर देश आहे . गर्दीत रामाच्या दर्शनाला जाणार नाही. राज्यसभेचा कार्यकाळ संपल्यानंतर जाईन, असे शरद पवार यांनी स्पष्ट केले.

## मथुरा स्थानकावर ब्लॉक; हमसफरच्या दोन तर गोंडवाना एक्स्प्रेसच्या चार फेऱ्या रद्द

**दि.९ विदर्भ प्रजासत्ताक अकोला**

आग्रा विभागातील मथुरा स्टेशनवर यार्ड रिमॉडेलिंगचे काम सुरू असून, या कामासाठी पलवल-मथुरा दरम्यान नॉन इंटरलॉकिंग कामासाठी काही मेल एक्स्प्रेस गाड्या रद्द करण्यात येत आहेत. यामध्ये अकोला मार्गे धावणाऱ्या जम्मूतावी हमसफर एक्स्प्रेस व गोंडवाना एक्स्प्रेस या दोन रेल्वेंचा समावेश असल्याने अकोलेकर प्रवाशांना अडचणींचा सामना करावा लागणार आहे.

रेल्वे प्रशासनाकडून प्राप्त माहितीनुसार, १२७५१ नांदेड-जम्मूतावी हमसफर एक्स्प्रेस २६ जानेवारी व २ फेब्रुवारी रोजी प्रस्थान स्थानकावरून रद्द करण्यात आली आहे. १२७५२ जम्मतावी-नांदेड हमसफर एक्स्प्रेस २८ जानेवारी व ४ फेब्रुवारी रोजी प्रस्थान स्थानकावरूनच रद्द करण्यात आली आहे.याशिवाय १२४०५ भुसावळ-हजरत निझामुद्दीन गोंडवाना एक्स्प्रेस २८ व ३० जानेवारी तसेच ४ व ६ फेब्रुवारी रोजी प्रस्थान स्थानकावरून धावणार नाही. १३४०६ हजरत निझामुद्दीन-भुसावळ गोंडवाना एक्स्प्रेस २६ व २८ जानेवारी तसेच २ व ४ फेब्रुवारी रोजी प्रस्थान स्थानकावरून रद्द करण्यात आली आहे.

## मुस्लिम बांधवांनी देखील २२ जानेवारी रोजी रामनामाचा जयघोष करावा, मुस्लिम राष्ट्रीय मंचचे आवाहन

**दि.९विदर्भ प्रजासत्ताक नागपूर :**

अयोध्येतील श्रीराम मंदिराच्या प्राणप्रतिष्ठेसाठी देशभरात उत्साहाचे वातावरण असताना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यकर्त्यांनी स्थापन केलेल्या मुस्लिम राष्ट्रीय मंचतर्फेदेखील मोठे आवाहन करण्यात आले आहे. देशासाठी तो ऐतिहासिक दिवस राहणार असून मुस्लिम बांधवांनीदेखील कमीत कमी ११ वेळा रामनामाचा जयघोष करून जगासमोर सामाजिक समरसतेचा मजबूत संदेश द्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

मुस्लिम राष्ट्रीय मंचचे संरक्षक इंद्रेश कुमार यांनी २०२३ च्या अखेरीस नवी दिल्लीत याबाबत आवाहन केले होते. त्यानंतर देशपातळीवर मंचच्या मुस्लिम कार्यकर्त्यांकडून नियोजन सुरू झाले. त्यानुसार देशातील बऱ्याच मशीदी, मदरसे यांच्यासह मुस्लिम धर्मगुरुंची भेट घेऊन त्यांच्यासमोर हा मुद्दा मांडल्या जात आहे. देशाला सामाजिक समरसतेचे उदाहरण जगासमोर मांडण्याची मोठी संधी आहे.



अनेक मुस्लिम बांधवांनी राममंदिराच्या निधी संग्रहातदेखील सहकार्य केले. मुस्लिम राष्ट्रीय मंचानेदेखील सुरुवातीपासूनच मंदिराची बाजू लावून धरली होती. अशा स्थितीत २२ जानेवारी घर, मशीद किंवा मदरसे येथे रामनामाचा जयघोष करण्याचे व जल्लोष करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे अयोध्येच्या जवळपासच्या भागातून राममंदिरापर्यंत मुस्लिम बांधवांनी पायी मार्च काढून पोहोचावे असेदेखील आवाहन करण्यात येत आहे. त्याला प्रतिसाद देत काही मुस्लिम तरुणांनी पुढाकार घेत पायी मार्च सुरू केला आहे.

**ही एक ऐतिहासिक संधी**

याबाबत मुस्लिम राष्ट्रीय मंचचे राष्ट्रीय संयोजक यांनी प्रसारमाध्यमांसमोर आपली भूमिका स्पष्ट केली. जगासमोर भारतातील सामाजिक समरसता येणे आवश्यक आहे. ही एक ऐतिहासिक संधी आहे.

## ‘आस्था दाखवा, आक्रमकता नको’

## अयोध्येतील प्राणप्रतिष्ठापना सोहळ्याबाबत मोदींची मंत्र्यांना सक्त ताकिद

**दि.९विदर्भ प्रजासत्ताक अयोध्या**

अयोध्येत होणाऱ्या राम मंदिरातील प्राणप्रतिष्ठापना सोहळ्याबाबत भाजपा आणि केंद्र सरकारमध्ये उत्साहाचं वातावरण दिसून येत आहे. तसेच या सोहळ्यासाठीची जय्यत तयारीही सुरू आहे. दरम्यान, राम मंदिरातील प्राणप्रतिष्ठापना सोहळ्याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या मंत्रिमंडळातील मंत्र्यांना सक्त



ताकिद दिली आहे. राम मंदिरातील प्राणप्रतिष्ठापना सोहळ्यादरम्यान आस्था प्रदर्शित करा, मात्र आक्रमकता दिसता कामा नये, अशी सूचना पंतप्रधान नरेंद्र मोदींनी दिली आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सरकारमधील मंत्र्यांना कुठल्याही प्रकारची विधानं करणं टाळण्याचा सल्ला दिला आहे. तसेच मंत्र्यांनी सरकारच्या मर्यादांचीही काळजी घ्यावी, असे नरेंद्र मोदी म्हणाले आहेत. मंत्र्यांनी राम मंदिराच्या प्राण प्रतिष्ठापना सोहळ्यादरम्यान, आपापल्या क्षेत्रांमध्ये कुठल्याही प्रकारची गडबड होणार नाही याची काळजी घ्यावी, असाही सल्ला दिला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी सांगितले की, आपापल्या क्षेत्रातील लोकांना २२ जानेवारीनंतरच रामलल्लांच्या दर्शनाला घेऊन जा. दरम्यान, २२ जानेवारी रोजी राम मंदिराची प्राणप्रतिष्ठापना होणार आहे. त्यामध्ये देशातील निवडक लोकांना निमंत्रण देण्यात आलं आहे. त्यानंतर मोठ्या प्रमाणावर लोक अयोध्येत येण्याची शक्यता आहे. त्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी अशी सूचना दिलेली आहे.

## उद्या लोकशाहीचा खून करणार?; नार्वेकर-शिंदे भेटीनं वादळ उठलं, पवार-ठाकरे कडाडले

**दि.९विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

आमदार अपात्रतेबाबत १० जानेवारीपर्यंत विधानसभा अध्यक्षांना निर्णय सुनावण्याची मुदत आहे. ठाकरे गट आणि शिंदे गट या दोन्ही आमदारांची सुनावणी विधानसभा अध्यक्षांकडे पूर्ण झाली असून आता सर्वांचे लक्ष निकालाकडे लागले आहे. त्यातच अलीकडेच विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. त्यामुळे उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांनी यावर आक्षेप घेत ज्यांच्याकडून निकालाची अपेक्षा आहे त्यांनी ज्यांच्यावर सुनावणी सुरू आहे त्यांची भेट घेणे हे संशयास्पद आहे असं शरद पवारांनी म्हटलं आहे.

शरद पवारांनी मुंबईत पत्रकार परिषद घेत म्हटलं की, ज्यांच्यापुढे प्रकरण आहे आणि



ज्यांची केस आहे. ती केस मांडणे चुकीचे नाही. परंतु ज्यांच्यासमोर केस मांडली आहे आणि ज्यांच्याकडून निकाल अपेक्षित आहे. त्यांनी ज्यांची केस आहे त्यांच्याकडे जात असतील तर संशयाला चिंता वाटावी अशी परिस्थिती निर्माण होते. हे केले नसते तर या पदाची प्रतिष्ठा आणखी चांगली राहिली असती असं त्यांनी म्हटलं.

तर हा खटला वैयक्तिक नसून देशात पुढे लोकशाही राहणार आहे की नाही. हे दोघे मिळून लोकशाहीचा खून करणार आहेत हे उद्याच्या निर्णयावरून कळेल. मी मुख्यमंत्री होतो. कधीही विधानसभा अध्यक्ष मुख्यमंत्र्यांकडे जात नाही तर अध्यक्ष मुख्यमंत्र्यांना बोलावून घेऊ शकतात. परंतु हे दोघे फक्त मुख्यमंत्री आणि विधानसभा अध्यक्ष नाहीत. एक न्यायाधीश आहे तर दुसरे आरोपी आहेत. मग न्यायाधीश ज्यांच्यावर आरोप आहेत त्यांना भेटू शकतात का? यातून संशय येतो की या दोघांची मिलीभगत तर नाही ना..असा सवाल उद्धव ठाकरेंनी विचारला. दरम्यान, आम्ही सुप्रीम कोर्टासमोर प्रतिज्ञापत्र दाखल केलंय. त्यात एकदा नव्हे तर दोनदा मुख्यमंत्री आणि विधानसभा अध्यक्ष यांची भेट झाली हे सांगितलं आहे. जनतेच्या कोर्टात आम्ही जातोय. जनतेचा अधिकार कुणी हिसकावून घेऊ शकत नाही.




## संपादकीय ......

# सबकुछ ऑनलाईन..!

स्मार्टफोन आणि इंटरनेटचा वापर सुरू झाल्यापासून सगळे काही ऑनलाईन होत आहे तुम्हाला रेल्वे, बस, ट्रॅव्हल्स किवा विमानाची तिकिटे बुक करायची असतील, तर कुठेही जाण्याची गरज नाही मोबाईल फोनवर चार-पाच वेळा क्लिक करून तुम्ही कोणतेही तिकीट बुक करू शकता. चित्रपट पाहायचाय, नाटक पाहायचे आहे किंवा एखादा सांस्कृतिक संगीताचा कार्यक्रम पाहायचा आहे, बुक माय शोसारखी ॲप आहेत जी काही सेकंदांत तुम्हाला तिकीट बुक करून देतात. नुसते बुकिंग नाही, तर तुम्हाला पैसे पण भरावे लागतात. ते पैसे भरण्यासाठी त्याच तुमच्या स्मार्टफोनवर विविध पर्याय आहेत. त्यामधून तुम्ही काही सेकंदांत पैसे पण भरू शकता. म्हणजे आता जगणे जवळपास ऑनलाईन झाले आहे.भाज्या, किराणा, नेहमी लागणाऱ्या वस्तु, औषधी या पण ऑनलाईन मागवता येतात. समजा, तुमच्या घरी एखादा पदार्थ चांगला झाला आहे आणि गावात राहणाऱ्या तुमच्या मुलीला तुम्हाला तो पाठवायचा आहे. तुम्ही तो ऑनलाईन पाठवू शकता. असाच प्रकार वाढदिवसाच्या गिफ्ट देण्याचा आहे. समजा, एखाद्याला वाढदिवसाच्या दिवशी तुम्हाला एखादे गिफ्ट पाठवायचे आहे. ऑनलाईन ऑप्शनमधून तुम्ही ते गिफ्ट निवडा, त्यावर ज्याला पाठवायचे आहे त्याचे नाव कळवा, ते नाव त्या गिफ्टवर प्रिंट होऊन त्या ठरलेल्या दिवशी तुम्ही सांगाल त्या वेळेला त्या व्यक्तीपर्यंत पोहोचवले जाऊ शकते. तुम्ही केवळ पेमेंट करायचे आहे.

ज्यांची मुले वर्किंग आहेत, म्हणजे कुठे ना कुठेतरी नोकरी करत आहेत, त्यांच्या घरी दररोज काही ना काही तरी पार्सल ऑनलाईन येऊन पडत असतात. आपला मुलगा किंवा मुलगी काय मागवते, हे आई-वडिलांना कधीच कळत नाही. त्यांचे काम केवळ आलेले पार्सल घेणे आणि न फोडता तसेच ठेवून देणे एवढेच आहे. पेमेंट करायची गरज नाही, कारण या पार्सलचे पेमेंट आधीच झालेले असते. अशा पद्धतीने शर्ट, पैन्ट, जैकेट, शूज किवा काय वाटेल ते मागवता येण्याची सोय झाली आहे. आपण जुने ग्राहक असू तर आपण बाजारात जाऊन शर्ट किंवा साडी निवडत असतो. फार झाले तर एखादा शर्ट आवडला नाही किवा मापाला आला नाही तर दुसऱ्या दिवशी त्याच दुकानात जाऊन आपण तो शर्ट किंवा ती साड़ी परत करण्याची प्रथा होती. शिवाय प्रत्येक दुकानात ड्रेस चेज करण्यासाठी दिवसातले दोन तास नेमून दिलेले असतात आणि त्या दोन तासांतच तुम्हाला ते परत करायला लागतात, शिवाय खरेदी केल्यानंतर फार-फार तर सात दिवस तो बदलून घेण्याचा वेळ दिलेला असतो.घरी काही धार्मिक विधी करायचे असतील तर ते विधी कसे करायचे हे सांगणारे पण ऑनलाईन ॲप आहेत. पूजेच्या सुरुवातीपासून ते पार आरतीपर्यंत मोबाईल सांगेल त्याप्रमाणे पूजा करायची आणि आपले विधी संपन्न करून घ्यायचे. आता तुम्ही म्हणाल, ऑफलाईन काय राहिले आहे? आहेत... बयाच गोष्टी अद्याप ऑनलाईन होऊ शकत नाहीत. अर्थात, कोरोना काळात अंत्यसंस्कार पण ऑनलाईन झाले होते. कुणी हजर राहण्याची शक्यता नव्हती. त्यामुळे कर्मचा-यांनी अत्यसंस्कार उरकून घेतले आणि ते मृत व्यक्तीच्या लोकांनी ऑनलाईन पाहिले.

## ‘विकसित भारत संकल्प यात्रे’चा जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला आढावा

# योजनांची माहिती लाभार्थ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी मिशनमोडवर काम करा- सौरभ कटियार



**दि.८विदर्भ प्रजासत्ताक अमरावती-** शासनाच्या फ्लॅगशीप योजनांचे लाभ लक्षीत लाभार्थ्यांपर्यंत पोहचावे, यासाठी केंद्र आणि राज्य शासनाच्या सहकार्याने ‘विकसित भारत संकल्पना यात्रा’ ही मोहिम राबविण्यात येत आहे. या यात्रेच्या माध्यमातून केंद्र शासनाच्या योजनांची माहिती लाभार्थ्यांपर्यंत मिशन मोडवर पोहोचविण्याचे काम संबंधित यंत्रणांनी करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी दिले. जिल्हाधिकारी यांच्या दालनात जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली विकसित भारत संकल्प यात्रा मोहिमेची आढावा बैठक घेण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते. नवी दिल्ली भारत सरकार वित्त मंत्रालयाचे उपसचिव आदित्य भोजगढिया यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. मुख्य कार्यकारी अधिकारी अविश्यांत पंडा, जिल्हा अग्रणी बँकेचे प्रबंधक पंकज कुमार, जिल्हा आरोग्य अधिकारी सुरेश आसोले, उपमुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब बायस, मनपाचे उपआयुक्त डॉ. मेघना वासनकर, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राहुल सातपुते तसेच विविध विभाग प्रमुख यावेळी उपस्थित होते. श्री. कटियार म्हणाले की, विकसित भारत संकल्प यात्रा ही मोहीम जिल्ह्यात दि. २३ नोव्हेंबरपासून सुरु करण्यात आली आहे. आतापर्यंत ५७५ गावांमध्ये ही यात्रा पोहोचली असून शासनाच्या विविध योजनाचा लाभ लाभार्थ्यांना देण्यात आला आहे. उर्वरित २६६ गावामध्ये यात्रेच्या माध्यमातून जास्तीत जास्त लाभार्थ्यांना लाभ मिळेल, यासाठी सुक्ष्म नियोजन करावे. गावपातळीवर लोकप्रतिनिधी व ग्रामस्थ यांचे सहकार्य घेण्यात यावे. ज्या लाभार्थ्यांना लाभ दिला आहे, त्यांची माहिती केंद्र शासनाच्या वेब पोर्टलवर नियमित अपलोड करावी. आगामी निवडणुक आचारसंहिता लक्षात घेऊन मिशन मोडवर यंत्रणांनी केंद्र सरकारच्या विविध योजना लाभार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवा, असेही ते यावेळी म्हणाले.उपसचिव श्री. भोजगढीया म्हणाले की, विकसित भारत संकल्प यात्रा ज्या गावामध्ये जाणार आहे, त्या गावातील लाभार्थ्यांना केंद्र सरकारच्या विविध योजनांची माहिती व्हावी, यासाठी विविध माध्यमांचा वापर करण्यात यावा. जेथे लाभार्थ्यांनी अद्यापही केंद्र सरकारच्या विविध योजनांचा लाभ घेतला नाही, त्यांच्यापर्यंत योजनांची माहिती प्रभावीपणे पोहोचवावी. यासाठी युवा वर्ग, महिला बचत गट व विद्यार्थ्यांना सहभागी करून घ्यावे. जिल्ह्यातील ग्रामीण तसेच दुर्गम भागात केंद्र सरकारच्या योजनांची माहिती प्रभावीपणे पोहोचविण्यात यावी, अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

# ३ व ४ फेब्रुवारीला विदर्भस्तरीय खंजरी स्पर्धेचे आयोजन

## प्रौढ महिला व बाल या ३ गटात होईल स्पर्धा, कलारसिक संस्था अमरावतीचे आयोजन

**दि८ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती-** विदर्भ स्तरीय खंजरी भजन स्पर्धा आयोजित कलारसिक संस्थेचे आयोजन सामाजिक तथा सांस्कृतिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या कलारसिक संस्था अमरावती द्वारा दिनांक ३ व ४ फेब्रुवारी २०२४ रोजी संत गाडगेबाबा मंगल कार्यालय कठोरा नाका अमरावती येथे विदर्भ स्तरीय खंजरी भजन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून ही स्पर्धा प्रौढ, महिला व बाल गटात घेण्यात येईल एकाच गावचे पाच गायक असल्यास १० गुण बोनस व उद्धाटनाला मंडळ हजर असल्यास १० गुण बोनस ठेवण्यात आले आहेत जिल्हातील जास्तीत जास्त भजन मंडळांनी सहभाग घ्यावा अशी विनंती आयोजन समिती अध्यक्ष भोलेश्वर मुदगल यांचे वतीने करण्यात आली आहे.

# जो स्वप्न देखते बाबर के, अरमान मिटाकर मानेंगे!

## घोषणा आणि गीतांनी संकल्प केला दृढ



*कारसेवा करण्यासाठी पोहचण्याचा एकच निर्धार होता. विविध प्रांतांमधून अयोध्येकडे जाणाऱ्या सर्व ट्रेन कारसेवकांनी तुडुंब होत्या. ३१ ऑक्टोबर १९९० या दिवशी कारसेवा करायची होती. १५ ऑक्टोबर पासूनच कारसेवक अयोध्येकडे निघाले होते. आपण सहज अयोध्येला पोहचू शकणार नाही, याची पुरेपूर कल्पना आलेली होती.आम्ही अमरावती जिल्ह्यातील कारसेवक ज्या ट्रेनने चाललो होतो, त्या ट्रेनला माणिकपूर रेल्वे स्थानकावरच थांबवून सर्वांना अटक करण्यात आली. शेकडो कारसेवक होते. त्या मानाने पोलिसांची संख्या तुटपुंजी होती. बहुतांश कारसेवकांनी पोलिसांना चकमा दिला आणि आम्ही माणिकपूरहून पायी नयनी गाठले. येथून सर्वांची फाटाफूट झाली. ज्या समूहाला जो रस्ता मिळेल तसे अयोध्येला पोहचायचे हा सर्वांचा प्रयत्न होता. अनेकांना कारागृहात डांबण्यात आले. आज ३४ वर्षांनंतरही हा सर्व घटनाक्रम आजही डोळ्यासमोर ताजा आहे. नयनी पासून गंगा यमुना सरस्वती हा त्रिवेणी संगम नदीतून पार केल्यानंतर झुंसी पासून अयोध्येपर्यंतचा प्रवास पायीच होता. मोठी शहरे चुकवत शेताच्या काठाकाठांनी लहान खेड्यातील लोकांनी शिजवलेल्या खिचडीचा, मुरमुरे आणि गुळाचा आस्वाद घेत पायी चालायचे. रात्री जमिनीवर अंथरलेल्या तनसाच्या शय्येवर काही क्षणात डोळा लागायचा. माझे हे अनुभव आत्मप्रौढीसाठी नाही तर ३० ऑक्टोबर १९९० च्या कारसेवेला जे जे गेले त्या सर्वांचे तसेच अनुभव आहेत. ते प्रातिनीधिक स्वरूपाचे म्हणून लिहितो आहे. अनेकांचा तर पोलिसांनी अनन्वित छळ केला. गावोगावचे लोक रामभक्तांच्या जतथ्यांना पुढचा प्रवास सांगायचे. पुढच्या गावात पोहचले की तिथे पुढचा मार्ग सांगितला जाईल, एवढेच लोक सांगायचे. अयोध्या कितनी दूर है, या प्रश्नाचे उत्तर ठराविक साचेबंद मिळत होते. जणू काही ते लोक प्रशिक्षित केले होते. बस थोडा चले की पहुंच गये अयोध्याजी ! हे ’थोडा चले’ म्हणजे किती किलोमीटर चालायचे हे उत्तर मिळत नव्हते. कारण, कोणीही रामभक्त जास्त अंतरामुळे रामकार्यापासून मागे फिरू नये, ही त्या गावकऱ्यांची भावना होती. झुंसी, सराय इनायत, प्रतापगढ, तिवारीपूर, दर्शन नगर असा तो प्रवास आणि सर्व टप्पे आठवले की ते खरोखरच रामकार्य होते, याची आज प्रचिती येते. आपोआप टोळी तयार व्हायची आणि ती पुढे सरकत राहायची. ते दिवस आठवले की बडनेराचे स्व. भास्करराव पवार, स्व. सुधीर घिमे, अनंत जोशी, अनंत पांडे, मनीष भट, जगदीश धुमाळे, राजू वाऊ, राजू बानाईत, अविनाश पातूरकर, अमरावतीच्या भाजीबाजार परिसरातील राजा खारकर, संजय महाजन, राजेंद्र महाजन ज्याला मिठ्ठू म्हणून ओळखायचे, मनोज पवार, शाम सावरकर आणि डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालयात शिकणारे तेव्हाचे दोन विद्यार्थी डॉ. अतुल सरोदे आणि डॉ भालेराव यांच्या नावांचे स्मरण झाल्या विना राहवत नाही.या खडतर प्रवासात साथ होती गीतांची आणि घोषणांची. रामजी की सेना चली या रामायण मालिकेतील रवींद्र जैन यांनी गायलेल्या गीताच्या सांघिक गायनाने संकल्प दृढ व्हायचा. थकवा दूर व्हायचा.निश्चर हीन करेंगे धरती यह प्रण है श्री राम काजब तक काम न पूरण होगा नाम नही विश्राम काउसे मिटानें चलें की जिसका मंत्र वयम रक्षाम कासमय आ गया निकट राम और रावणके संग्राम काया ओळींनी बाहू पुन्हा स्फुरायला लागायचे.कोटि-कोटि हिन्दू जन का, हम ज्वार उठाकर मानेंगे।सौगंध राम की खाते है, हम मंदिर भव्य बनायेंगे ।।जन-जन के मन मे राम रमे, हर प्राण-प्राण में सीता है।कंकर-कंकर शंकर इसका, हर श्वास-श्वास में गीता है।जीवन की धडकन रामायण, पग-पग पर पडी पुनीता है।यदि राम नहीं श्वासों में, तो प्राणों का घट रीता है।नर-नाहर श्री पुरुषोत्तम का, शुभ मंदिर भव्य बनायेंगे ।।जो नीति अपावन शासन की, वह नीति तोडकर मानेंगे।जो सत्तामद में भरा हुआ, वह कुम्भ फोडकर मानेंगे।जो फैल रही है आंगन में, विषबेल कुचलकर मानेंगे।जो स्वप्न देखते बाबर के, अरमान मिटाकर मानेंगे।कितना पशुबल है दानव में, हम उसे तौलकर मानेंगे ।।हे गीत आंदोलनाचे प्रेरणा स्तोत्र बनले होते. कारसेवकांच्या, रामभक्तांच्या दृढनिश्चयाने हे गीत म्हणजे अयोध्या आंदोलनाचा मंत्र ठरले होते. संपूर्ण आंदोलनात आणि कारसेवेच्या पायी प्रवासात वीर शिवा राणा प्रताप ने फिर तुमको ललकारा है - कहो गर्व से हम हिन्दू हैं हिंदुस्तान हमारा है, बच्चा-बच्चा राम का जन्मभूमि के काम का, रण चंडी को नर मुण्डो की माला हम पहनाएंगे - राम लला हम आए हैं मंदिर भव्य बनाएंगे, सौगन्ध राम की खाते है - हम मंदिर भव्य बनांएगे, जिस हिन्दू का खून न खौले खून नही वह पानी है - जो राम के काम न आए वह बेकार जवानी है, जो नही राम के काम का - वो नही हमारे काम का, एक धक्का और दो - बाबरी मस्जिद तोड़ दो, या आवेशपूर्ण घोषणांचे योगदान प्रचंड बळ देणारे होते.श्रीरामजन्मभूमी आंदोलनादरम्यान असंख्य लोकांनी फोनवर बोलताना ’हॅलो’ ऐवजी ’जय श्री राम’ म्हणण्याचा संकल्प केला होता. ३४ वर्षांपासून काही जण आजही त्या संकल्पाचे पालन करताना आपल्याला दिसतात. हे सर्व अतर्क्य होते. अचाट होते आणि हे रामानेच घडवून आणले होते, असेच आज मागे वळून पाहताना म्हणावेसे वाटते.*



**शिवराय कुळकर्णी**
**प्रवक्ता, भाजपा, महाराष्ट्र**
**९८८१७१७८२७**




## ॲसिडिटी देखील आहे हृदय विकाराच्या झटक्याचे लक्षण; जाणून घ्या कधी व्हावं सावध!

**दि.८विदर्भ प्रजासत्ताक-** मागील दोन वर्षात हृदयविकार आणि कार्डिएक अरेस्टच्या प्रकरणांमध्ये वाढ झाली आहे. काही वर्षांपूर्वी वयाची ५० शी ओलांडल्यानंतर हृदयविकार असल्याचे आढळून येत होते. मात्र, बदलत्या जीवनशैलीने आता १८-२० वर्षांच्या मुलांमध्ये हृदयविकार बळावत असल्याचे समोर आले आहे. फिटनेसकडे लक्ष देणारी मंडळींना देखील हृदयविकाराचा झटका येत आहे.

**हृदयविकाराच्या झटक्याचे कारण**

हृदयविकाराचा झटका येण्यामागे एकच नाही तर अनेक कारणे आहेत, असे आरोग्य तज्ज्ञांचे मत आहे. मात्र, याचे सर्वात मोठे कारण म्हणजे जीवनशैली. तरुणांचे कामाचे तास वाढले असल्याने अनेकांचे व्यायामाकडे दुर्लक्ष होत आहे. त्याशिवाय, कुटुंबांपासून दूर राहणाऱ्या युवकांचे आणखीच हाल होतात. एकटे राहत असलेले युवक हे फास्ट फूडवर अवलंबून असतात. कामाचा ताण वाढल्याने धूम्रपान किंवा मद्यपान केल्याने त्यांच्या हृदयाच्या आरोग्यावर परिणाम होतो.

अनेक वेळा अनुवांशिकतमुळे हृदयविकाराचा झटका येण्याचा धोका असतो. सध्याच्या जीवनशैलीत शारीरिक हालचाली जवळपास नगण्य झाल्याचं तज्ज्ञ सांगतात. त्याशिवाय वाढलेला ताण हलका करण्यासाठी, मन मोकळं करण्यासाठी जवळपासच्या व्यक्ती नसल्याने अनेकजण मानसिक तणावात असतात.

**हृदयविकाराचा झटका टाळण्यासाठी काय करावे**

आरोग्य तज्ज्ञांच्या मते, व्यायाम किंवा आहाराव्यतिरिक्त झोप न लागणे, तणाव, रक्तदाब, साखर यांचाही हृदयाच्या आरोग्यावर परिणाम होतो. अशा परिस्थितीत, नियमित व्यायाम करण्याव्यतिरिक्त, जर तुम्ही झोप, रक्तदाब, साखर, तणाव आणि आहाराबाबत निष्काळजी असाल, तर हृदयविकाराचा झटका येण्याचा धोका असतो. त्यामुळे या सर्व गोष्टींकडे लक्ष देऊन तुम्ही तुमच्या हृदयाचे आरोग्य चांगले ठेवू शकता. हृदयाच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी व्यायाम, उत्तम आहार, झोप, ध्यान-योगाचा आपल्या दिनक्रमात समावेश करा आणि तणाव-



धूम्रपान-दारू यांपासून दूर राहा.

**हृदय निरोगी ठेवण्यासाठी काय करावे**

अन्नातील प्रथिने वाढवा, कर्बोदके कमी करा. फळे खा. आहारातून मीठ, साखर, तांदूळ आणि मैद्याचे पदार्थ कमी करा, त्यांना वगळा.

तणाव कमी करण्यासाठी प्रत्येक उपायावर काम करा.

झोपण्याची एक वेळ आणि तास निश्चित ठेवा. कमी झोप घेणे टाळा.

दररोज २५-३० मिनिटे कार्डिओ व्यायाम करा.

हृदयविकाराचा धोक्याचा इशारा

अन्न खाल्ल्यानंतर पोटात आम्लपित्त होत असल्यास

जास्त चालताना किंवा पायऱ्या चढताना श्वास लागणे

जबड्यापासून कंबरेपर्यंत जडपणा जाणवणे

पूर्वी सहज केले जाणारे काम करण्यात अडचण

अचानक अस्वस्थता वाटणे

हृदयविकाराचा कौटुंबिक इतिहास

# डॉ.पंजाबराव देशमुख रुग्णालय जनआरोग्य योजनांमध्ये सलग दुसऱ्यांदा अव्वल




**दि.८विदर्भ प्रजासत्ताक अमरावती:-** श्री शिवाजी शिक्षण संस्था द्वारा संचालित डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अमरावती येथे महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना राबविल्या जातात. सन २०२३-२०२४ साठी जिल्हातून एकमेव खाजगी रुग्णालय म्हणून सर्वाधिक गुण घेवून सलग दुसऱ्यांदा अनुकरणीय कामगिरी केल्या बद्दल अमरावती जिल्ह्याचे मा. जिल्हाधिकारी श्री. सौरभ कटीयार यांच्या हस्ते व जिल्हा परिषद मुख्य कार्यपालन अधिकारी श्री.अविश्यांत पांडा यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हाधिकारी कार्यालय येथे प्रमाणपत्र देऊन सन्मानीत करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्रतिनिधी डॉ. मुक्ता देशमुख, डॉ. श्रीकांत फुटाणे, धनराज चव्हाण, अक्षय पावडे, वैभव भोरे उपस्थित होते.


आरोग्य अधिकारी श्री गजानन पांडे, डॉ. मटाले, डॉ. भिसे, डॉ. आवारे, श्री मानेकर व श्री मस्के उपस्थित होते.

श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे मा. अध्यक्ष श्री. हर्षवर्धन देशमुख, महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. अनिल देशमुख व रुग्णालय वैद्यकीय अधिक्षक डॉ पी. आर. टेकाडे, डॉ. एस. आर. निर्मळ यांनी महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना चमुचे अभिनंदन केलेले आहे.

# उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री अजित पवार यांनी घेतला ऑनलाईन आढावा

## अमरावती जिल्ह्यासाठी ३७१ कोटीच्या प्रारुप आराखड्याला मंजूरी; दोनशे कोटींची अतिरिक्त मागणी





### धारणी, चिखलदरा या आकांक्षित तालुक्यांना अधिकचा निधी

**दि.९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती,–** महाराष्ट्राच्या आर्थिक विकासदरामध्ये अमरावती जिल्ह्याची टक्केवारी अधिक वाढावी यादृष्टीने येथील विकास कामांना गतीने चालना द्यावी. पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी मेळघाट येथे इको टुरिझम निर्माण करा. यातून जिल्ह्याच्या आर्थिक उत्पन्नात भर पडेल, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री (नियोजन) अजित पवार यांनी आज केले.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा वार्षिक योजनेची (सर्वसाधारण) राज्यस्तरीय बैठक मंत्रालयातील उपमुख्यमंत्री कार्यालयाच्या समिती सभागृहात आयोजित करण्यात आली होती. यावेळी विदर्भातील नागपूर व अमरावती विभागातील अकरा जिल्ह्यांचा आढावा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी घेतला. या बैठकीला ऑनलाईन पध्दतीने राज्याचे उच्च तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्य तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत (दादा) पाटील, नियोजन विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय उपस्थित होते. तसेच अमरावती जिल्हा नियोजन भवन येथून खासदार नवनीत राणा, आमदार सुलभा खोडके, आमदार देवेंद्र भुयार, विभागीय आयुक्त डॉ. निधी पांडेय, जिल्हाधिकारी सौरभ कटियार, मुख्य कार्यकारी अधिकारी अविश्यांत पंडा, जिल्हा नियोजन अधिकारी अभिजीत म्हस्के आदी यावेळी उपस्थित होते.

जिल्हा वार्षिक योजनेतून मिळालेला निधीच्या खर्चाची जबाबदारी प्रशासकीय विभागांकडे असून येणाऱ्या निवडणूका व आचारसंहिता लक्षात घेता तातडीने निधी विकास कामांवर खर्च करावा. निधी वेळच्यावेळी खर्च करतानाच विकास कामे दर्जेदारपणे पूर्ण करावीत. नागपूरच्या धर्तीवर नाविण्यपूर्ण उपक्रमांतर्गत मेळघाट, चिखलदरा या भागामध्ये इको टुरिझम संकल्पना विकसित करा. यासाठी त्वरित कृती आराखडा तयार करा. चिखलदरा येथे पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी स्काय वॉकची निर्मिती करण्यात येत आहे. या प्रकल्पाला समांतर विकास प्रकल्प येथे निर्माण करा. येथील पर्यटकांसाठी विविध सोयी-सुविधा विकसित करा. येथील मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या विकास कामांवर भर द्या. तसेच येथे डव्हेंचर टुरिझम निर्माण व्हावे, या दृष्टीने कार्यवाही करण्यात यावी. यासाठी लोकप्रतिनीधींनी पाठपुरावा करावा. धारणी, चिखलदरा या आकांक्षित तालुक्याच्या निर्देशांकात वाढ करण्यासाठी अधिकचा निधी उपलब्ध करुन देण्यात येईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री (नियोजन) अजित पवार यांनी यावेळी दिली. अमरावती विभागीय आयुक्त डॉ. निधी पांडेय तसेच जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी नागपूर येथील इको टुरिझम संकल्पनेची प्रत्यक्ष पाहणी करुन आराखडा सादर करावा, असेही ते यावेळी म्हणाले.

जिल्ह्याच्या विकासासाठी जिल्हा नियोजन समितीने ३७१ कोटी रुपयांच्या प्रारुप आराखड्याला मंजूरी दिली आहे. जिल्ह्यात विविध योजना राबविण्यासाठी दोनशे कोटींची अतिरिक्त मागणी यावेळी करण्यात आली. सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात हा निधी खर्च करण्यात येणार आहे. यंदा अधिक निधी वाढवून मिळावा, अशी मागणी लोकप्रतिनीधींकडून करण्यात आली. जिल्ह्यांची लोकसंख्या, भौगोलिक क्षेत्रावर आधारीत तयार करण्यात आलेल्या सूत्रानुसार निधीचे वितरण करण्यात येईल. तथापि गतवर्षी जिल्हा वार्षिक योजनेच्या माध्यमातून देण्यात आलेल्या निधीपेक्षा यंदा अधिकचा निधी देण्यात येईल. जिल्हा वार्षिक योजनेच्या माध्यमातून करण्यात येणाऱ्या कामांच्या गुणवत्तेत कोणत्याही प्रकारची तडजोड करु नये, प्रत्येक काम गुणवत्तापूर्ण झाले पाहिजे, अशा सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिल्या.

पालकमंत्री चंद्रकांत (दादा) पाटील म्हणाले, अमरावती जिल्हा भौगोलिकदृष्या मोठा आहे. येथील उर्जा विभागामार्फत येत्या काळात २२ गावांना लाभ देण्यात येणार आहे. मेळघाट क्षेत्रातील धारणी, चिखलदरा तालुक्यातील स्वयंसहाय्यता महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या मालाला बाजारपेठ उपलब्ध व्हावी, यासाठी अमरावती शहरात 'मेळघाट हाट' विक्री केंद्र सुरु करण्यात आले आहे. यामुळे बचत गटातील महिलांना स्वयंरोजगार प्राप्त झाला आहे. तसेच मेळघाटातील कुपोषणावर मात करण्यासाठी विविध शासकीय योजना राबविण्यात येत असून महिला व बाल विकास विभागामार्फत उपक्रमही राबविण्यात येत आहेत. मेळघाटातील इको टुरिझम विकसित करुन येथील व्याघ्र प्रकल्पाला चालना देण्यात येईल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

चिखलदरा व धारणी क्षेत्रात इको टुरिझम विकसित करावे. येथे येणाऱ्या पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी जंगल सफारी सुरु करावी. जिल्ह्यातील मुलभूत विकास कामांना आवश्यक निधी उपलब्ध करुन द्यावा. अमरावती शहरातील स्त्री रुग्णालयाचे काम पूर्ण झाले असून ते लवकरात लवकर नागरिकांसाठी खुले करण्यात यावे, अशी मागणी खासदार नवनीत राणा यांनी यावेळी केली.

आमदार सुलभा खोडके यांनी जिल्ह्याच्या विकासासाठी जिल्हा वार्षिक योजनेत वाढीव निधीची मागणी केली. महानगरपालिकेच्या शाळेच्या इमारती शिकस्त झाल्या आहेत. त्यांच्या पुर्नबांधणीसाठी निधी उपलब्ध करुन देण्यात यावा. सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, जिल्हा सामान्य रुग्णालय, जिल्हा स्त्री रुग्णालय यांना वाढीव निधी उपलब्ध करुन द्यावा. विदर्भ ज्ञान विज्ञान संस्थेच्या (व्हीएमव्ही) शिकस्त इमारतीच्या दुरुस्तीसाठी निधीची तरतूद करुन देण्यात यावी. तसेच नाविण्यपूर्ण योजनेंतर्गत रुग्णालयात दाखल रुग्णांच्या नातेवाईकांना राहण्याची सोय उपलब्ध व्हावी, यासाठी शासकीय रुग्णालयाच्या परिसरात त्यांच्या निवास व्यवस्थेसाठी धर्मशाळेची स्थापना करण्यात यावी, विभागीय क्रीडा संकुलाच्या व्यवस्थापनासाठी निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी त्यांनी यावेळी केली.आमदार देवेंद्र भुयार यांनी जिल्ह्यातील महेंद्री जंगल सफारी येथे पर्यटकांना सोयी-सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी निधीची मागणी केली. तसेच महानुभावांची काशी रिध्दपूर येथे श्रध्देने दरवर्षी जगभरातून पर्यटक येतात. येथील पर्यटकांना आरोग्य सुविधा मिळावी, यासाठी येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला मान्यता देण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली.

# इर्विन चौक स्थित साखळी उपोषण स्थळी आमदार सुलभाताई खोडके यांनी दिली भेट

**दि९ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती–** संसदेत मंजूर झालेल्या भारतीय न्यायिक संहिता २०२३ या कायद्यानुसार, हिट ऍण्ड रन प्रकरणांत संबंधित दोषी चालकाला ७ लाख रुपयांपर्यंत दंड आणि १० वर्षापर्यंतच्या तुरुंगवासाची तरतूद आहे.केंद्र सरकारकडून वाहनचालक-मालकांसाठी प्रस्तावित असलेल्या ' हिट ऍण्ड रन ' या कायद्याला संपूर्ण देशभरात विविध संघटनांनाचे तीव्र विरोध करण्यात आला आहे.यादरम्यान वाहतुकदारांनी देशव्यापी पुकारलेल्या संपामुळे त्याचा सर्वाधिक फटका इंधन पुरवठ्यावर झाला होता. वाहतुकदारांचा संप आणि इंधनाच्या अनुपलब्धतेमुळे संपूर्ण पुरवठा साखळीच ठप्प झाली होती.मोटार व्हेईकल कायद्याच्या अंतर्गत येणार्या हिट अँड रनच्या कलमातील शिक्षेच्या तरतुदींवरून देशभरातील ट्रक आणि टँकरचालकांनी तीन दिवसांचा संप पुकारून सर्वसामान्य नागरिकांना वेठीस धरले असतानाच,हिट अँड रनमधील तरतुदी तूर्तास लागू न करण्याचा महत्वाचा निर्णय केंद्रसरकारने मंगळवारी उशिरा रात्री घेतला.अशातच अमरावती जिल्ह्यातील अमरावती जिल्हा वाहन चालक कृती समितीचे वतीने हिट अँड रन कायदा कायमस्वरूपी रद्द करण्यात यावा, या मागणीला घेऊन ३ जानेवारी २०२४ पासून साखळी उपोषण सुरू करण्यात आले आहे.शासन-प्रशासनाच्या वतीने अद्यापही दखल न घेण्यात आल्याने डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक ( इर्विन चौक) समीपच्या परिसरात अमरावती जिल्हा वाहन चालक कृती समितीचे वतीने सोमवार दिनांक ८ जानेवारी २०२४ पासून आमरण उपोषणाला सुरुवात करण्यात आली.अशातच सोमवारी आमदार सौ. सुलभाताई संजय खोडके यांनी उपोषण मंडपाला भेट दिली. नवीन मोटार वाहन कायद्यात अपघातास ट्रक चालकाला जवाबदार धरले जाणार आहे. सरकार आज मोठ्या वाहतुकदारांसाठी नियम लादत आहे. भविष्यात लहान मालवाहतूकदारांनाही असाच दंड आकारण्यात येईल.या कायद्यामुळे मालवाहतूकदार देशोधडीला लागतील,त्यामुळे हा कायदाच रद्द करण्यात यावा,अशी एकमुखाने सर्व आंदोलक-साखळी उपोषणकर्ते यांनी यावेळी आमदार-सौ. सुलभाताई खोडके यांना मागणी केली.



हिट अँड रन कायदा कायमस्वरूपी रद्द करण्यात यावा तसेच वाहनचालकांच्या ज्या अन्य काही आहेत त्या मागण्यांना घेऊन आपण आवाज उठवीत त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्नरत राहू.अशी भूमिका स्पष्ट करीत,आपण या लढ्यात अमरावती जिल्हा वाहन चालक कृती समितीचे सदैव सोबत आहोत.असा विश्वास यावेळी आमदार-सौ. सुलभाताई खोडके यांनी यावेळी व्यक्त केला.

# देशी दारू विरोधात चैतन्य कॉलनी येथे रस्ता रोको आंदोलन

## अनेक माजी नगरसेवकांनी दिली साथ

### बांधकाम होत असलेल्या देशी दारू दुकान गेटजवळ दिल्या घोषणा



**दि.९ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती –** अमरावती शहरातीलजुना बायपास मार्गावरील चैतन्य कॉलनी येथे बांधकाम होत असलेल्या देशी दारू दुकाना विरोधात आझाद समाज पार्टी च्या वतीने सोमवारी चक्काजाम आंदोलन करण्यात आले..बडनेरा चपराशी पुरा मार्गाने जाणार्या रस्त्यावर शेकडो नागरिकांनी दोन्ही मार्गावर चक्काजाम करण्यात आला.. यावेळी प्रशासन विरोधात प्रचंड घोषणाबाजी करून नवीन निर्माण होणार्या देशी दारू विरोधात निषेध व्यक्त करण्यात आला.. चक्कजाम झाल्याने दोन्ही मार्गावर लांब पर्यत वाहने थांबली होती.. यादरम्यान येत्या १०दिवसात निर्णय लागला नाही तर देशी दारू दुकाना समोर धरणे आंदोलन करण्यात येणार असा अल्टीमेट देण्यात आला.. आझाद समाज पार्टी चे मनिष साठे, किरण गुळधे यांच्या नेतृत्वात आंदोलन करण्यात आले.. यावेळी याच प्रभागाच्या माजी उपमहापौर संध्या टिकले, माजी नगरसेवक अविनाश मार्डीकर माजी नगरसेवक मंगेश मनोहरे, यांनी सुद्धा आंदोलनाला साथ देऊन सहभागी झाले.

## डॉ बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय उत्तम नगर येथे

# क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती संपन्न



**दि.९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** -डॉ बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय उत्तम नगर अमरावती येथे ३ जानेवारी २०२४ रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती संपन्न झाली.प्रसंगी उद्घाटक म्हणून संस्थेचे सचिव प्रा पी. आर .एस राव सर उपस्थित होते. प्रमुख व्याख्यात्ता म्हणून उत्कृष्ट वक्त्या डॉ दिपाली चिखले( वाय . डी. वी . डी कॉलेज तिवसा) उपस्थित होत्या . कार्यक्रमास संस्थेचे प्रशासकीय अधिकारी सचिन पंडित सर , महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनील कुमार सर उपस्थित होते . या निमित्ताने , सत्कार घेण्यात आला. प्रास्ताविक महिला समिती प्रमुख डॉक्टर वर्षा गावंडे यांनी केले.सूत्रसंचालन ओघवत्या इंग्रजी भाषेत कु. प्रिया किरटकर हिने केले ,आभार प्रदर्शन इंग्रजी भाषेत कु प्रतीक्षा थोरात हिने केले सत्कार घेण्यात आला . स्टेट लेवल बॉल बॅडमिंटन स्तरातील टीम मध्ये महाविद्यालयातील कू प्राची उके हिने स्थान प्राप्त केल्याबद्दल तिचा सत्कार घेण्यात आला . उद्घाटन भाषणात प्राध्यापकराव सर यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासाचे महत्त्व वेळेचे महत्त्व स्पष्ट करून सातत्य पूर्व परिश्रम केल्यास यश निश्चित संपादित केले जाते याविषयी मार्गदर्शन केले. तसेच महाविद्यालयात प्रोफेसर पदी नियुक्ती झालेल्या प्राध्यापकांचे सत्कार करण्यात आले. डॉ वर्षा गावंडे सर्व प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते .

# महिला महाविद्यालयात जिल्हा स्तरिय उद्योजक मेळावा 'संक्रांत उत्सव २०२४' चे आयोजन

**दि.९विदर्भ प्रजासत्ताकअमरावती –** नूतन विदर्भ शिक्षण मंडळ द्वारा संचालित महिला महाविद्यालय, अमरावती येथील गृहाअर्थशास्त्र विभागा तर्फे जिल्हा स्तरिय उद्योजक मेळावा 'संक्रांत उत्सव २०२४' चे आयोजन दि. १० व ११ जानेवारी ला जोशी हॉल, अमरावती येथे सकाळी १० ते रात्री ९ या वेळेत आयोजित करण्यात येत आहे. महिला उद्योजकांना सामाजिक आर्थिक हातभार लावणे, महिलांच्या उत्पादित वस्तुच्या विक्रीकरितां व्यासपीठ उपलब्ध व्हावे या हेतूने महाविद्यालयातील गृह अथशास्त्र विभागाद्वारे या जिल्हास्तरीय उद्योजक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.संक्रांत सणाचे औचीत्य साधून संक्रांती साठी आवश्यक असणाऱ्या वस्तू , गृहउपयोगी वस्तू, हस्तकलेच्या वस्तू,लोणचे, पापड , वस्त्र दागीणे, इ. वस्तू तसेच विविध नाविण्यपूर्ण वस्तूचे स्टॉल या उद्योजक मेळाव्याचे खास आकर्षण असणार आहे. महिला उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी उद्योजक, मेळाव्याला भेट देण्याचे आवाहन महिला महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ अविनाश मोहरील व गृहअर्थशास्त्र विभाग करीत आहे.

**मेळाव्याचे विशेष आकर्षण–**(१) संक्रांत सुंदरी स्पर्धा(२) संक्रांत विशेष सेल्फी पॉइंट(३) लकी ड्रॉ(४) अनेक आकर्षक बक्षिसे(५)डिस्काउंट कूपन(६) कॅरीओके स्टार ग्रुप तर्फे गाण्यांची महेफिल..

# यंदा घोड्यावर स्वार होऊन येणार संक्रांती,

## पण काळा रंग असणार वर्ज्य



**दि.८विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

हिंदू धर्मामध्ये मकर संक्रांतीचे अधिक महत्व आहे. या सणापासून वसंत ऋतूची सुरुवात होते. पौष महिन्यामध्ये जेव्हा सूर्य धनू राशीमधून मकर राशीमध्ये प्रवेश करतो. तेव्हा मकर संक्रांत साजरी केली जाते. २०२४ मध्ये १५ जानेवारीला संक्रांत साजरी केली जाईल. तसेच यंदा देवीचे वाहन, शस्त्र आणि रुप कसे असेल हे आपण याबातमीच्या माध्यमातून जाणून घेऊया.

संक्रांती ही एक देवी असून हे देवी भगवतीचे एक रुप आहे. मकर संक्रांतीच्या दिवशी देवी भगवतीने संक्रासूर नावाच्या राक्षसाचा वध केला होता. तेव्हापासून हा सण साजरा केला जातो. मकर संक्रांतीला देवी संक्रांती दरवर्षी विविध वाहनावर बसून येते. तसेच, तिच्या हातात दरवर्षी वेगवेगळी शस्त्र असतात. प्रत्येकवर्षी ती वेगवेगळ्या रंगाचे वस्त्रही परिधान करते. ज्या रंगाचे वस्त्र देवी संक्रांतीने परिधान केलेले असते, तो रंग मकर संक्रांतीच्या दिवशी वर्ज्य मानला जातो.

यंदा काळा रंग वर्ज्य

यंदा देवी संक्रांतीचे मुख्य वाहन घोडा असून त्यासोबतच उपवाहन सिंह देखील आहे. ती उत्तरेकडून दक्षिणेकडे जात आहे. तसेच, तिची दक्षिण-पश्चिम दिशेकडे दृष्टी आहे. तिने हातामध्ये भाला घेतला असून तिच्या कपाळावर हळदीचा टिळा लावलेला आहे. ती वृद्धावस्थेत येत आहे. तसेच, यावर्षी देवी संक्रांतीने काळे वस्त्र परिधान केले आहे. त्यामुळे यंदा संक्रांतीला काळा रंग परिधान करणं वर्ज्य मानलं जाईल. खरंतर, दरवर्षी संक्रांतीला काळा रंग आवर्जून परिधान केला जातो. मात्र, यंदा हा रंग वर्ज्य आहे.

# नागपुरी गेट ठाण्यात रक्त तपासणी शिबिर



**दि.९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती :** 'रायझिंग डे' सप्ताहनिमित्त सोमवार, ८ जानेवारी रोजी नागपुरी गेट ठाण्यात पोलीस अधिकारी व अंमलदारांकरिता रक्त तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सदर शिबिर हेल्पींग हॅण्ड बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आले होते. शिविराला पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, साहाय्यक पोलीस आयुक्त पूनम पाटील, कैलास पुंडकर, यांच्यासह सर्व वरिष्ठ पोलीस निरीक्षक व इतर पोलीस अधिकारी यांनी शिबिराला भेट देऊन रक्त तपासणी केली. शिबिरामध्ये मार्गदर्शन करताना पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी अधिकारी व अंमलदार यांना उत्तम आरोग्यासाठी जागरूक राहून नियमित रक्त तपासणी करावी, असे आवाहन केले. प्रसंगी पोलीस आयुक्तांच्या हस्ते हेल्पींग हॅण्ड बहुउद्देशीय संस्थेचे भूषण दलाल व त्यांचा टिमचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. या शिबिरात एकूण ९५ अधिकारी व अंमलदार यांनी रक्त तपासणी केली.

# मेळघाटातील ३१४ धान्य दुकानांना टाळे

## कमिशन वाढविण्यासाठी संप



**दि.९ विदर्भ प्रजासत्ताक धारणी,** कुपोषण, बालमृत्यू आणि मातामृत्यूसाठी ओळखल्या जाणार्या मेळघाटातील चिखलदरा तालुक्यातील १५२ तर धारणी भागातील १६२ स्वस्त धान्य दुकानांना आठवड्यापासून कुलुपे लागल्याने नवीन वर्षात कुपोषणाचा उद्रेक होऊन आदिवासी गरीबांवर समस्यांचे आभाळ कोसळण्याची दाट शक्यता वाटत आहे. संपूर्ण महाराष्ट्रातील स्वस्त धान्य दुकानदारांसाठी अवाजावी आणि जाचक अटी सरकारने घातल्यावर कमी कमिशन देऊन शासकीय धान्य वितरण व्यवस्था काटेकोरपणे राबविण्याचे काम देण्यात आल्याने दुकानदारांनी संप पुकारलेला आहे. कमिशन प्रतिक्विंटल तीनशे रुपये किंवा ५० हजार रुपये प्रतिमाह देण्याच्या आग्रही मागणीसाठी संप पुकारण्यात आलेला आहे.

ऑल इंडिया फेअर प्राईज शॉप डिलर्स फेडरेशनच्या निर्णयानुसार धारणीच्या स्वस्त धान्य विक्रेता संघटनेचे अध्यक्ष संतोष बैस, सचिव राजेश तिवारी यांच्या नेतृत्वात मेळघाटातील ३१२ दुकाने बंद ठेवण्यात आलेली आहेत. आठ दिवस लोटले तरी स्वस्त धान्य मिळत नसल्याने आता गरीब आदिवासींजवळ असलेले धान्य संपायला सुरुवात झालेली आहे. म्हणून पुन्हा मेळघाटात पोषण आहाराअभावी बालमृत्यू, मातामृत्यू वाढण्याची शक्यता आहे. मेळघाटातील कुपोषणामुळे राज्य शासनाने सुमारे ९० टक्के कुटुंबांना प्रधानमंत्री अन्न सुरक्षा योजनेत सामील करून दोन वेळच्या जेवणाची सोय केलेली आहे. अन्नसुरक्षा व प्राधान्य कुटुंब योजनेत मोठ्या संख्येत आदिवासी कुटुंबे सामावलेली असून संपामुळे खाण्यासाठी धान्य मिळणे अशक्य झालेले आहे.

एकीकडे अंगणवाडी केंद्र बंद असल्याने बालकांना आहार मिळणे बंद पडलेले आहे. आता स्वस्त धान्य दुकाने संपावर आल्याने पुन्हा दोन वेळच्या जेवणाचा प्रश्न निर्माण झाला आहे. म्हणून शासनस्तरावर उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. १९९३-९४ च्या कुपोषणात हजारो बालकांचा बळी गेल्याची आठवण शासन स्तरावर अजुनही जिवंत आहे तर १ जानेवारीपासून राशन दुकाने बंद पडून सार्वजनिक धान्य वितरण योजना ठप्प झाल्याने पुन्हा कुपोषण उद्भवण्याची शक्यता आहे. तात्काळ मेळघाटच्या विषम स्थितीची दखल घेण्याची गरज आहे.

# अमरावती जिल्ह्याच्या वार्षिक नियोजनाचा नियतव्ये ७०० कोटींचा करा - आ. सौ. सुलभाताई खोडके

## जिल्हा वार्षिक नियोजन आढावा बैठकीत उपमुख्यमंत्री महोदयांशी ऑनलाईन संवाद

## महापालिका क्षेत्रासाठी नियोजन आराखड्यात १०० कोटी रुपयांची तरतुद करण्याची मागणी.

**दि८ विदर्भ प्रजासत्ताकअमरावती** - आगामी मार्च महिन्यामध्ये लोकसभा निवडणुकीची आंचार संहिता लागण्याची शक्यता असल्याने तत्पूर्वी राज्याचे अर्थ संकल्पीय अधिवेशन आटोपण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री ना. अजितदादा पवार यांच्या अध्यक्षतेखाली सोमवार दिनांक ८ जानेवारी २०२३ रोजी अमरावती विभागातील पाचही जिल्ह्यातील वर्ष २०२४-२५च्या जिल्हा वार्षिक नियोजनाचा आढावा ऑनलाईन पद्धतीने आढावा घेतला. या संदर्भात जिल्हा नियोजन भवन येथे आयोजित व्हिडीओ कॉन्फरंसिंग बैठकीमध्ये अमरावतीच्या आ. सौ. सुलभाताई संजय खोडके यांनी सहभागी होऊन अमरावतीच्या विकासाचे मुद्दे मांडले.

अमरावती जिल्हा वार्षीय नियोजन मागील वर्षीचा २०२३-२४ चा अपेक्षित खर्च ३९५ कोटी आहे. जिल्हा वार्षिक नियोजन समितीला शासनाकडे प्राप्त मर्यादे अनुसार प्रस्तावित केलेला नियतव्ये ३७१ कोटीचा आहे. पण सर्व यंत्रणा मिळून १११६ कोटीची मागणी आहे. त्यामुळे प्रस्तावित केलेले नियतव्ये व मागणी यामध्ये मोठे अंतर असल्याने अमरावती जिल्हा वार्षिक नियोजन २०२३-२०२४ च्या शासनाने दिलेल्या मर्यादेत वाढ करून वार्षिक नियोजन आराखडा ७०० कोटीचा करण्यात यावा.अशी सूचना आमदार महोदयांच्या वतीने करण्यात आली.



अमरावती शहराचा झपाट्याने विस्तार होत असून अमरावती शहराची लोकसंख्या देखील १० लक्षाच्या वरती गेलेली आहे. अमरावती व बडनेरा असे दोन मतदार संघ येतात, त्यामुळे अमरावती शहराच्या मूलभूत सोयी सुविधेसाठी निधी अपुरा पडत आहे. वर्ष २०२२-२३ च्या जिल्हा नियोजनात अमरावती महापालिकेसाठी आराखडयामध्ये बदल करून १२ कोटीवरून २९.०१कोटी रुपये करण्यात आला. व जिल्हा वार्षिक योजना सन २०२३-२४मध्ये अमरावती मनपा शहरी भागासाठी ३४कोटी रुपयांपर्यंत गेला आहे. मात्र अमरावती शहर हे विभागाच्या मुख्यालयाचे ठिकाण असल्याने हा निधी देखील अपुरा पडत आहे. अमरावती महानगर पालिका ड वर्गाची महापालिका असल्याने उत्पन्नाचे स्रोत कमी आहे. त्यामुळे मूलभूत सोयी सुविधेसाठी निधी पुरत नाही, त्यामुळे सन २०२४-२५च्या जिल्हा वार्षिक नियोजन आराखड्यामध्ये अमरावती महानगर पालीकेसाठी १०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात यावी, अशी मागणी करीत आमदार सौ. सुलभाताई खोडके यांनी उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री ना. अजितदादा पवार यांच्याशी डीपीसीच्या बैठकीतून ऑनलाईन संवाद साधला. सुपर स्पेशालिटी - सार्वजनिक आरोग्य विभागा अंतर्गत राज्यामध्ये २ ठिकाणी सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल चालू आहे नाशिक आणि अमरावती. अमरावती येथील सुपर हॉस्पिटलमध्ये हृदयरोग विभाग,कर्करोग विभाग, प्लास्टिक सर्जरी शस्त्रक्रिया विभाग,मेंदूरोग शस्त्रक्रिया विभाग, नेफ्रॉलॉजी विभाग, बालरोग शस्त्रक्रिया व एन.सी.डी. विभाग असे विभाग सुरू असून रिनल ट्रान्सप्लांट सारख्या जटिल शस्त्रक्रिया देखील येथे होतात.आता झालेल्या बजेट मधून आपण ३५ कोटी रुपये सुपरस्पेशालिटी हॉस्पिटलसाठी दिले आहेत पण येथे लागणाऱ्या मेडिसिन, मेंटेनन्स तसेच किरकोळ खरेदीसाठी कोणताही हेड जिल्हा नियोजन अंतर्गत नाही तरी आपण सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलसाठी नवीन हेड निर्माण करून २५ कोटी रुपयांची तरतूद देण्यात यावी.तसेच अमरावती जिल्ह्यात मेळघाट सारखा कुपोषित भाग आहे तसेच अमरावती विभागाचे ठिकाण असल्याने इतर जिल्ह्यातील रुग्ण देखील अमरावतीत मोठ्या प्रमाणात येतात.करिता जिल्हा सामान्य रुग्णालया करिता १० कोटी रुपये व जिल्हा स्त्री रुग्णालया करिता १० कोटी रुपये तरतूद देण्यात यावी.अशी मागणी आमदार महोदयांच्या वतीने करण्यात आली . तसेच अमरावती शहराचा विकास झपाट्याने होत असून लोकसंख्या देखील वाढत आहे.त्यामुळे नवीन नवीन वस्त्या निर्माण होत आहे. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी तर्फे लाईन शिफ्टिंग करिता तसेच नवीन ट्रान्सफॉर्मर करिता निधी उपलब्ध होत नाही. जिल्हा नियोजन तर्फे एमएसईबी साठी तरतूद करतांना ग्रामीण व शहर असे दोन भाग करावे व शहरी भागासाठी १० कोटी रुपयांची तरतूद करण्यात यावी.लोकांच्या मागणीनुसार मी सध्या ७ कोटी रुपयांचे प्रस्ताव जिल्हा नियोजन कडे पाठविलेले आहे. तो मान्य करून निधी उपलब्ध करण्याची मागणी यावेळी करण्यात आली. त्याचबरोबर व्हीएमव्ही अर्थात विदर्भ महाविद्यालयाला नुकतेच १०० वर्षे पूर्ण झाले. महाविद्यालयाचा १६५ एकरचा त्यांचा मोठा परिसर असून बिल्डिंग देखील १०० वर्षे जुन्या आहेत,त्यामध्ये मेंटेनन्स च्या मोठ्या समस्या उद्भवतात व त्यासाठी तरतूद देखील कमी असते.करिता विदर्भ महाविद्यालयाच्या मेंटेनन्ससाठी जास्त तरतूद करण्यात यावी.

# उमेद तर्फे तीन दिवसांचे 'मिनी सरस' प्रदर्शनी

## ५० स्वयं सहाय्यता समूहाचा सहभाग



## नागरिकांनी लाभ घेण्याचे आवाहन- अविश्यांत पंडा

**दि.९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती -** महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान(उमेद) मार्फत स्वयं सहाय्यता समूहांनी उत्पादित केलेल्या साहित्याची 'मिनी सरस' विक्री प्रदर्शनी दि. १२ ते १४ जानेवारी दरम्यान सायन्स स्कोर मैदान, अमरावती येथे आयोजित करण्यात आली आहे. या प्रदर्शनीत स्वयं सहाय्यता समूहाव्दारे उत्पादित विविध खाद्य पदार्थ व वस्तूचे ५० स्टॉल लावण्यात येणार आहे. तीन दिवशीय प्रदर्शनीचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी अविश्यांत पंडा यांनी केले आहे.

ग्रामीण भागातील स्वयं सहाय्यता समूहातील महिलांचे जीवनमान उंचावणे, त्यांचे सबलीकरण व उपजीविका आधारित उपक्रम उमेदमार्फत राबविण्यात येतो.

याचाच एक भाग म्हणून स्वयं सहाय्यता समूहांनी उत्पादित केलेल्या मालाला बाजारपेठ मिळवून देण्यासाठी विक्री प्रदर्शनीचे आयोजित करण्यात आले आहे. या प्रदर्शनीमध्ये जिल्ह्यातील ३० स्वयं सहाय्यता समूह तसेच अमरावती व नागपूर विभागातील प्रती जिल्हा दोन स्वयं सहाय्यता समूह असे एकूण ५० समूहाचे स्टॉल लावण्यात येत आहे.

या प्रदर्शनीमध्ये ग्रामीण भागातील स्वयं सहाय्यता समूहाद्वारे उत्पादित विविध खाद्य पदार्थ, तसेच इतर आकर्षक वस्तू नागरिकांना खरेदी करिता ठेवण्यात येणार आहे. या मिनी सरस प्रदर्शनीमध्ये ५ स्टॉल शाकाहारी ज्यामध्ये रोडगे, पिठल, भाकरी, बासुंदी, मांडे, पुरणपोळी यांचा समावेश आहे. तर ५ स्टॉलवर मासाहारी खाद्यपदार्थांचा समावेश आहे.

प्रदर्शनीमध्ये नागरिकांना कळधान्य, सर्व प्रकारचे मसाले, डिंक लाडू, पंचरत्न लाडू, मोह लाडू, डिंक लाडू, ज्वारी, बाजरी, सोया प्रोडक्ट, सोया इडली, ढोकळा, हेल्दी आरोग्याकरिता मोरिंगा पावडर, हळद पावडर, सर्व प्रकारचे लोणचे, खारोडी, जवस चटणी, खडू चक्का तेल, शुद्ध देशी गाईचे तूप, गाईचे शेणाच्या धूप बत्ती, मुंग वडी, मकरसंक्रांत निमित्त हलव्याचे दागिने व तिलगुडिया व बांबू पासून विविध आकर्षक वस्तू विक्री करिता या प्रदर्शनीमध्ये मिळणार आहे, अशी माहिती जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणाचे प्रीती देशमुख यांनी दिली आहे.

# मंत्रालयास घेरावासाठी निघालेल्या प्रकल्पग्रस्तांना अमरावतीत रोखले



**दि८ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** - प्रलंबित मागण्यांसाठी मंत्रालयास घेराव करण्यास मोर्शीवरुन निघालेल्या ३०० वर प्रकल्पग्रस्तांना सोमवारी सायंकाळी पोलिसांनी रोखले. त्यामुळे त्यांनी रात्री जिल्हाधिकारी कार्यालयात शिदोऱ्या काढून ठिय्या दिला. अचानक झालेल्या या आंदोलनाने प्रशासनाची तारांबळ उडाली.

येथे मोठ्या प्रमाणात पोलिस बंदोबस्त लावण्यात आलेला आहे. दरम्यान आम्ही कोणत्याही मार्गाने मुंबई गाठू, असा निर्धार याप्रकल्पग्रस्तांनी व्यक्त केला.विविध मागण्यांसाठी अप्पर वर्धा प्रकल्पग्रस्त कृती समितीचे मोर्शी तहसील कार्यालयासमोर १९ मे २०२३ पासून आत्मक्लेश आंदोलन सुरु आहे. या आंदोलनाला २४५ दिवस झालेले आहे.

त्यापूर्वी शासनाचा लक्षवेध करण्यासाठी २५ ऑगस्ट २०२३ रोजी १० ते १२ प्रकल्पग्रस्तांनी मुंबई मंत्रालयातील तिसऱ्या माळ्यावरुन सुरक्षा जाळीवर उडी घेत घोषणा दिल्या व राज्याचे लक्ष वेधले होते.



# महापालिकेच्या झोन पथकाने केली नायलॉन मांजा जप्तीची कार्यवाही

**दि.८विदर्भ प्रजासत्ताक अमरावती -** मकरसंक्रांतीचा सण जवळ आल्याने पतंग आणि मांजाला मोठी मागणी असून नायलॉन मांजा हा घातक असल्याचे सांगूनही सर्रास वापर होत असल्याचे उघड होत आहे. सोमवार दिनांक ०८ जानेवारी,२०२४ रोजी महानगरपालिका झोन क्र.१, झोन क्र.४, झोन क्र.५ अंतर्गत गाडगेनगर, प्रविण नगर रामपुरी कॅम्प, सिंधी चौक, व्हिएमव्ही रोड, नवीवस्ती बडनेरा, साबणपुरा येथे पतंग विक्रेते यांच्याकडे नायलॉन मांजा बाबत पाहणी करण्यात आली. या पाहणी दरम्यान नायलॉन मांजाला बंदी असतांनाही सदर ठिकाणी महापालिकेच्या पथकाला तपासणीत आस्थापनामध्ये नायलॉन मांजा आढळून आला. तो पथकाने जप्त करुन दंडात्मक कार्यवाही केली. सदर कार्यवाहीत झोन क्र.१ चे जेष्ठ स्वास्थ निरीक्षक एस.ए. शेख, स्वास्थ निरीक्षक, झोन क्र.४ चे जेष्ठ स्वास्थ निरीक्षक राजु डिक्याव, स्वास्थ निरीक्षक, झोन क्र.५ चे जेष्ठ स्वास्थ निरीक्षक राजेश राठोड, स्वास्थ निरीक्षक उपस्थित होते. नायलॉन मांजाचे वापरामुळे जिवितांस तसेच पक्षांना मोठ्या प्रमाणावर क्षती पोहचते यामुळे मकर संक्रांतीच्या उत्सवादरम्यान पक्ष्यांचे दगावण्याचे प्रमाणात वाढ होते. नायलॉन धागा अविघटनशील असल्यामुळे त्याचे विघटन होत नाही, तसेच नायलॉन मांजाच्या संपर्काने विद्युत प्रवाह खंडीत होणे, शॉक लागणे, तसेच दुचाकीस्वार, पादचारी यांना इजा होणे किंबहुना जिवित हानी होते अशा घटना घडू नये याकरीता पतंग उडविण्याकरीता नायलॉन धागाचा (मांजा) वापर करु नये तसेच शहरातील कोणत्याही विक्रेत्याने नायलॉन मांजाची विक्री करु नये असे आवाहन अमरावती महानगरपालिकेकडुन करण्यात येत आहे.

# विभागीय लोकशाही दिनात २५ प्रकरणांवर चर्चा प्रलंबित प्रकरणांचा तात्काळ निपटारा करा- डॉ. निधी पाण्डेय

**दि९ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती,** नागरिकांकडून प्राप्त तक्रार अर्जांवर विहित कालमर्यादेत कार्यवाही करण्यात यावी. प्रलंबित प्रकरणांचा तात्काळ निपटारा करुन केलेल्या कार्यवाहीबाबत संबंधित तक्रारदारांना पत्राव्दारे कळविण्यात यावे, असे निर्देश विभागीय आयुक्त डॉ. निधी पाण्डेय यांनी संबंधित विभागांनादिले.



विभागीय आयुक्तालयाच्या सभागृहात विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली आज लोकशाही दिन व महिला लोकशाही दिनाचे कामकाज पार पडले. त्यावेळी त्या बोलत होत्या. उपायुक्त (पुरवठा) आर.एस. आडे, उपायुक्त (विकास) आर.ए. फडके, एस. व्ही. कावळे, महिला व बालविकास विभागाच्या विधी सल्लागार संध्या वानखडे, यवतमाळचे उपजिल्हाधिकारी सुदर्शन गायकवाड, आदिवासी विकास विभागाचे सहाय्यक आयुक्त शिवानंद पेढेकर यांच्यासह महसूल, पोलीस, कृषी, महापालिका, सहकार, महिला व बालविकास, समाजकल्याण व ऊर्जा विभागाचे अधिकारी यावेळी उपस्थित होते. लोकशाही दिनात स्वीकृत, अस्वीकृत व सामान्य तक्रार अर्ज अशा एकूण २५ प्रकरणांवर चर्चा करण्यात आली. विभागीय आयुक्त डॉ. पाण्डेय यांनी तक्रारदारांचे म्हणने ऐकुण घेतले. तसेच प्रकरणांच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना त्यांनी संबंधित विभागप्रमुखांना दिल्या. महिला लोकशाही दिनात एकही प्रकरण दाखल नसल्याचे महिला व बालविकास अधिकारी श्रीमती वानखडे यांनी सांगितले.

# पत्रकार हे समाजाचा आरसा

## उपाध्यक्ष अभिजित ढेपे यांचे प्रतिपादन, जिल्हा बँकेत पत्रकारांचा सत्कार समारंभ

**दि९ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती,-** पत्रकार हे समाजाला आरसा आहे. शासन, प्रशासन आणि समाज यातील महत्वाचा दुवा हा पत्रकार असतो,त्यामुळे समाजात या घटकाचे अनन्यसाधारण महत्व आहे.ते खर्या अर्थाने सत्कारास पात्र आहे.असे प्रतिपादन जिल्हा मध्यवर्ती बॅंकेचे उपाध्यक्ष अभिजित ढेपे यांनी केले.जागतिक पत्रकार दिनाचे औचित्स साधुन जिल्हा मध्यवर्ती बॅंकेत शहरातील सर्वच वृत्तपत्र व इलेक्ट्रानिक विभागाचे प्रतिनिधींचा सत्कार समारंभाचे आयोजन शनिवारी करण्यात आले होते. अध्यक्ष आ. बच्चु कडू यांच्या मागदर्शनात तसेच उपाध्यक्ष अभिजित ढेपे यांच्या संकल्पनेतुन सत्कार समारंभ पार पडला. कार्यक्रमाला अध्यक्षस्थानी उपाध्यक्ष अभिजित ढेपे, प्रमुख अतिथि म्हणुन संचालिका सुरेखा ठाकरे, संचालक रवींद्र गायगोले, अजय मेहकरे, चित्रा



डहाणे, बॅंकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र बकाल उपस्थित होते. यावेळी जितू दखणे, रवींद्र लाखोडे, गिरीश शेरेकर, भैय्या आवारे, संदीप शेंडे, सुधीर भारती, जितू दोशी,शैलेश धुंदी, दूर्वास रोकडे, विजय ऋषी, वैष्णवी मांडळे, योगिनी अर्डक, सुनील चौरसिया, प्रवीण कपिले, खोजयमा खुरम, संदीप मानकर, राजेंद्र ठाकरे, मनीष जगताप, सुरेंद्र आकोडे, प्रणय निर्वान, शिवराज उंबरकर, सुरज दहाट, नितेश राऊत, राज माहोरे सागर डोंगरे, अनिरुद्ध उगले, सागर तायडे, रोहित खाडे, अनिकेत दहातोंडे यांचा सत्कार घेण्यात आला.


पाहिजेत

विदर्भ प्रजासत्ताक
सांध्य मराठी दैनिक

अल्पावधीतच हजारो वाचकांच्या पसंतीस पडलेल्या सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक साठी जिल्ह्यातील प्रत्येक तालुका,गाव तसेच वॉर्डनिहाय पत्रकारांची गरज आहे.लिखाणाची आवड तसेच उत्कृष्ट जनसंपर्क असणाऱ्या व्यक्तींनीच आमच्या मेल आय डी वर आजच संपर्क करा

संपर्क- prajasattaknews24gmail.com

# सूर्यापासून १४ कोटी ८५ लाख किलोमीटर अंतरावरून 'आदित्य'चे काम सुरू



**दि.९विदर्भ प्रजासत्ताक श्रीहरिकोटा**

गेल्या शनिवारी, ६ जानेवारीला आदित्य एल-१ अंतराळयान एल-१ बिंदूवर त्याच्या नियुक्त हॅलो कक्षेमध्ये म्हणजे जवळजवळ लंबवर्तुळाकार, पण सुस्थिर कक्षेत पोहोचले आणि आधुनिक भारताची वैज्ञानिक सूर्योपासना सुरू झाली. पृथ्वीपासून १५ लाख किलोमीटर अंतरावरून, तर सूर्यापासून १४ कोटी ८५ लाख किलोमीटर अंतरावरून आदित्यने आपले काम सुरू केले आहे.

लॅग्रेंज पॉइंट १ वर अंतराळयानाला स्थानापन्न करण्यासाठी पृथ्वीवरील कक्षीय आणि सुदूर नियंत्रण आदेशांची काळजीपूर्वक मांडणी केलेली सूचनामालिका आवश्यक होती. या प्रक्रियेमध्ये प्रणोदन, प्रक्षेपण नियोजन आणि अचूक समायोजन यांचा समावेश होता. अंतराळयान सुरुवातीला ट्रान्स्फर ऑर्बिटमध्ये प्रक्षेपित केले गेले, मग ते पृथ्वीपासून एल-१ बिंदूच्या परिसरात पोहोचले.

इस्रोचे संचालक सोमनाथ शनिवारी म्हणाले की, कक्षेत नेमके स्थानापन्न करण्यासाठी आदित्य यानाचा वेग सेकंदाला ३२ मीटरवर आणणे आवश्यक होते. त्यानंतर अंतराळ यानाला ङ१ बिंदूभोवती प्रभामंडल कक्षा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या विशिष्ट प्रकारच्या कक्षेमध्ये नेले गेले. इस्रोने हे सर्व किचकट टप्पे अनेक सुदूर आदेशांनुसार यशस्वीपणे पार पाडले.

३ सप्टेंबर २०२३ रोजी पहिला टप्पा ऑर्बिट-रेझिंग बर्न आयोजित केला गेला, ज्याने यानाची कक्षा २४५ किमी गुणिले २२,४५९ किमीच्या कक्षेत वाढवली. ५ सप्टेंबर रोजी यानाची कक्षा कमाल ४०,२२५ किमी, १० सप्टेंबर रोजी कमाल ६१,६६७ किमी, १५ सप्टेंबर रोजी १,२१,९७३ किमीच्या कक्षेत आणली गेली. १९ सप्टेंबर रोजी, पृथ्वीच्या कक्षेतून बाहेर पडण्यासाठी शेवटचा आदेश देण्यात आला आणि आदित्य ङ१ अंतराळयान नंतर लॅग्रेंज १ बिंदूकडे निघाले. ३० सप्टेंबरला ते पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणाच्या प्रभावातून सुटले आणि लॅग्रेंज १ बिंदूकडे गेले. शेवटचा टप्पा होता हॅलो ऑर्बिट इन्सर्शन व तो ६ जानेवारी रोजी दुपारी ४ वाजता अगदी अचूकपणे पार पडला.

अंतराळयान एकदा प्रभामंडल कक्षेत गेल्यावर सुस्थिर होण्याचा प्रयत्न करते. ६ जानेवारीनंतर संपूर्ण प्रक्रियेदरम्यान इस्रो अंतराळयानाच्या टेलिमेट्रीचे सतत निरीक्षण करीत आहे आणि त्याचा मार्ग समायोजित करण्यासाठी, स्टेशन-किपिंग मॅन्युव्हर्स करण्यासाठी आणि त्याचे आरोग्य आणि कार्यक्षमता सुनिश्चित करण्यासाठी आदेश पाठवीत आहे.. आता त्यावरील उपकरणे सक्रिय करण्याचा टप्पा सुरू झाला आहे. एल-१ पॉइंट हा बिंदू आदित्य-१ ला पृथ्वीच्या सावलीमुळे किंवा इतर परिभ्रमण घटकांमुळे होणारे व्यत्यय न येता सूर्याचे सतत निरीक्षण करू देतो. या बिंदूवरून यानाला कक्षेत सुनिश्चित सातत्य राखून सौरप्रकाशमंडलाचे आणि सूर्याच्या सर्वांत बाहेरील थराचे सतत निरीक्षण करणे शक्य होते. पृथ्वीच्या वातावरणाच्या बाहेर असल्याने, एल-१ बिंदूवर आदित्य-१ वातावरणातील हस्तक्षेप टाळतो, ज्यामुळे स्पष्ट आणि अधिक अचूक सौरमंडल निरीक्षणे करता येतात.

आदित्य-१ चा उद्देश आहे सौरमंडलाचे उच्चस्तरीय, अचूक आणि सूक्ष्म निरीक्षण. सौर वारे, सौर ज्वाला आणि भयावह असे 'कोरोनल मास इजेक्शन' म्हणजे बाहेर फेकले जाणारे सौरद्रव्य यासह विविध सौर घटना समजून घेण्यासाठी या बाह्य स्तराचा अभ्यास करणे आवश्यक आहे. ही निरीक्षणे मूलभूत हेलिओफिजिक्स संशोधनात योगदान देतात. सौरमंडलीय मिशनचे ध्येय शास्त्रज्ञांना अवकाशातील हवामानाशी संबंधित माहिती गोळा करण्याचे आहे. फ्लेअर्स म्हणजे दीप्तीमान सौरशलाका आणि कोरोनल मास इजेक्शन यासारख्या सौरक्रियाकलापांमुळे अवकाशातील हवामानावर लक्षणीय परिणाम होऊ शकतो. शेकडो उपग्रहांच्या कक्षेवर, ऑपरेशन्स, दळणवळण प्रणाली आणि पृथ्वीवरील पॉवर ग्रीडवरही परिणाम होतो.

# आमदार अपात्रतेचा निकाल देणार नवी राजकीय दिशा; बुधवारी अंतिम निर्णय

**दि.९ विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**



महाराष्ट्राच्या राजकारणात २२ जून २०२२ नंतर झालेल्या उलथापालथीनंतर न्यायालयीन लढाई आणि विधानसभा अध्यक्षांसमोर सुनावणी अशा तब्बल दीड वर्ष चाललेल्या शिवसेना प्रकरणावर बुधवारी अंतिम निकाल येणार आहे. हा निकाल कोणत्या गटाच्या बाजूने लागतो यावर सरकारचे भवितव्य ठरणार आहे.

निकाल ठाकरे गटाच्या बाजूने लागला तर राज्य सरकारच्या अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह निर्माण होणार आहे. मात्र, हा निकाल शिंदे गटाच्या बाजूने लागला तर सरकारला निर्धोकपणे आपला कार्यकाळ पूर्ण करून आगामी लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीला सामोरे जाता येईल.

विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्याकडे पक्ष कुणाचा आणि आमदार अपात्रतेचा मुद्दा आल्याने ते न्यायालयीन लवादाच्या भूमिकेत आहेत. त्यामुळे त्यांना निष्पक्षपातीपणे निकाल द्यावा लागणार आहे. सुमारे चार महिने चाललेल्या मॅरेथॉन सुनावणीनंतर हा निकाल लागेल.

**दोन्ही गटांकडून जोरदार युक्तिवाद**

सुनावणीदरम्यान ठाकरे आणि शिंदे गटाकडून जोरदार युक्तिवाद करण्यात आला आहे. शिंदे गटाचे वकील महेश जेठमलानी यांनी तर थेट उद्धव ठाकरेंच्या शिवसेना पक्षप्रमुखपदावरच बोट ठेवले. त्याचप्रमाणे शिंदे यांना गटनेतेपदावरून हटविण्यासाठी झालेल्या बैठका आणि बजावण्यात आलेला व्हीप म्हणजे बनाव असल्याचा दावा त्यांच्याकडून करण्यात आला.त्याचवेळी ठाकरे गटाकडून २२ जूनआधी पक्षप्रमुख कोण होते, यावर अधिक भर देताना घटनेतील १० व्या सूचीचा आधार घेण्यात आला. पक्षविरोधी कृत्य केल्यामुळे सुरत, गुवाहाटीला गेलेले आमदार कसे अपात्र ठरतात हे सांगताना त्यांनी अध्यक्षांकडे निष्पक्ष निकालाची अपेक्षा व्यक्त केली होती.

# भारतीय संस्कृतीवर पाश्चात्य संस्कृतीचा पगडा

## बालयोगी उमेशनाथ महाराज यांची पत्रपरिषदेत माहिती

**दि.९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**



नागरिक पाश्चात्य सभ्यतेला स्वीकारत असल्याने ती भारतीय संस्कृतीवर हावी होत आहे. भाषा, वेष, भोजन, हे बिघडत चालले असून याला राजकीय, सामाजिक, धार्मिक, प्रशासकीय संस्था जबाबदार असल्याचे मध्य प्रदेश सरकारमध्ये कॅबिनेट दर्जा असलेले बालयोगी उमेशनाथ महाराज यांनी शासकीय विश्रामगृह येथे पत्र परिषदेत सांगितले.

राम जन्मभूमीचा संघर्ष हा पाचशे वर्षापासून चालत आला असून २२ जानेवारीला पूर्ण होणार आहे. हा कार्यक्रम अध्यात्मिक असून राजकीय नाही. देशाला प्रसन्नता वाटत असून राम मंदिराच्या कार्यात ज्यांनी मत भूमिका निभावली त्यांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करीत असल्याचे उमेशनाथ महाराज म्हणाले.

मुस्लिम समाजामध्ये त्यांच्या बालकांना शिक्षण देण्याकरिता पाठविले जाते.संस्कार घडविलेजातात. हिंदूंनीही सनातन संस्कृती वाचविण्याकरिता आपल्या मुलांना वयाच्या पाचव्या वर्षी दीक्षित करून गुरु चरणात पाठवायला हवे,तो गुरुमुखी व्हावा, असे बालयोगी उमेशनाथ म्हणाले.

देशातील संत व पत्रकार राष्ट्राचे हे सजग प्रहरी आहेत. संत आपल्या वाणीतून तर पत्रकार आपल्या लेखणीतून सत्य ते मांडत असतो. सत्य गोष्टी समाजासमोर मांडायला हव्यात. खऱ्या समरसतेकरिता सामाजिक सभ्यता, संस्कारावर चालल्यास भारतीय असल्याचे वाटते, असे यावेळी त्यांनी सांगितले. पत्रपरिषदेला माजी पालकमंत्री आमदार प्रवीण पोटे, तुषार भारतीय, चेतन पवार, रोहित कलोती, राजेंद्र पांडव, प्रवीण रुद्रकार, अखिलेश किल्लेदार, यश शर्मा, सारंग मातुरकर, सुरज वासनिक उपस्थित होते.

# नगरसेविकेचा पती, माजी नगरसेवकांमध्ये मारपीट

**दि.९विदर्भ प्रजासत्ताकपरतवाडा**

अचलपूर नगरपालिकेचे भाजी नगरसेवक आणि नगरसेविकेच्या पतीमध्ये लोंबाझोंबी झाली. यात नाकाला, कानाला ओरबडले गेले. चितपटही झाले. हे प्रकरण गंभीर वळणावर पोहोचले आहे. बघून घेण्याच्या भूमिकेत दोघेही तयारीला लागलेत. दरम्यान, पोलिस घटनास्थळी दाखल झालेत आणि पोलिसांच्या सतर्कतेने अनर्थ टळला,



परतवाडा शहरातील स्टेट बँकेजवळील सिव्हिल लाईन परिसरातील मार्केटमधील एका शोरूममध्ये भाजपाचे जुने-नवे पदाधिकारी व खंदे समर्थक सोमवारला दुपारी जमले. नव्या-जुन्या गोष्टी सुरू झाल्यात. मागील मतदानावर भाष्य केले गेले. पक्षाची ध्येयधोरणे, पक्ष व भूमिका जपणे महत्त्वाचे असल्याचे मतही मांडले गेले. यातून वाद विकोपाला गेला. यावर माजी नगरसेविकेच्या पतीची भूमिका अस्वीकाहार्य ठरल्यामुळे माजी नगरसेवक आणि नगरसेविकेचे पती यांच्यात लोंबाझोंबी झाली. कानाला, नाकाला ओरबडले गेले. एकाने दुसऱ्याला पटकले. बघून घेतो म्हणत पतीराज त्या शोरूममधून बाहेर पडले. भाजपच्या पदाधिकाऱ्यांसह ते नगरसेवकही आपल्या नियोजित कार्यक्रमस्थळी जाण्याकरिता बाहेर निघाले. भांडण होत असल्याच्या माहितीवरून पोलिस घटनास्थळाकडे धावले, पण पोलिसांना भांडणारेच दिसले नाहीत. म्हणून पोलिसांनी शोधाशोध सुरू केली. तेव्हा माजी नगरसेविकेचे तपती पोलिसांना दिसले. पोलिसांनी त्यांची समजूत काढली. ते समजलेत. विकोपाला गेलेल्या वादात होणारा अनर्थ टळला. घटनेच्या अनुषंगाने कोणीही पोलिसांकडे तक्रार दिली नाही, पण यात पोलिसांनी एक लोखंडी पाइप ताब्यात घेतला.

# भिशीच्या नावाने ६ लाख रु.हडपले

## १३ जणांची फसवणूक करीत महिला पसार

**दि९ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

भिशी सुरू करण्यासाठी अनेकांसोबत संपर्क साधून एका महिलेने तब्बल १३ महिलांकडून ६ लाख ८ हजार ५५० रुपये एवढी रक्कम लुबाडून पळ काढला. सदर महिलेविरुद्ध शहर कोतवाली पोलिसांनी फसवणूकीचा गुन्हा दाखल केला आहे.

यातील तक्रारकर्ती महिला गृहिणी असून, घरूनच साड्या विक्रीचा छोटेखानी व्यवसाय करते. संबंधित महिलेच्या पतीने दर महिन्याला २ हजार ५०० रुपये याप्रमाणे रक्कम भरून भिशी सुरू केली होती. मधात त्यांनी पहिली भिशो बंद करून ७० हजार रुपये संबंधित महिलेकडून परत सुद्धा घेतले होते. त्यानंतर महिलेच्या पतीने पुन्हा १ हजार ५०० रुपये याप्रमाणे महिन्याला भरून ९० हजार रुपयांची भिशी काढली होती. दरम्यान, संशयित महिलेने मुलीच्या आजारपणाचे कारण सांगून पीडित महिलेकडून १ लाख ४५ हजार रुपये रुपये घेतले.घेतलेले उधार पैसे परत देण्याकरिता स्वतःचे नागपुरातील घर विकण्याची तयार दर्शवून विश्वास संपादन केला, एक महिन्यात पैसे परत करण्याचे आश्वास संशयित महिलेने पीडितेला दिले होते. नोव्हेंबर २०२२ मध्ये महिला घर सोडून निघून गेली होती.दरम्यान, संशयित महिलेने केवळ पोडित एकट्याच महिलेचे भिशांचे पैसे घेतले नसून, इतर १३ महिलांनी सुद्धा संशयितेकडे दर महिन्याला ठराविक रक्कम भिशोच्या नावाने गुंतवणूक केली होती. त्यामुळे त्या महिला सुद्धा संशयित महिलेचा शोध घेत असल्याचे लक्षात आले. संशयित महिलेने एकूण १३ महिलांची ६ लाख ८ हजार ५५० रुपयांची फसवणूक केली असा आरोप, पोडित महिलेने कोतवाली ठाण्यात दाखल तक्रारीतून केला आहे.

जेवढ्या महिलांचे पैसे संशयित महिलेने भिशीच्या नावाने है घेतले, त्यांचे बयाण नोंदविल्या जाईल. सद्यः स्थितीत केवळ गुन्हाच दाखल झाला असून, कुणालाही अटक झाली नाही. चौकशीअंती पुढील कारवाई केल्या जाईल.

**– विजयकुमार वाकसे पोलिस निरीक्षक, शहर कोतवाली, अमरावती.**

# २३ गोवंशाचे प्राण वाचविले : नांदगाव खंडेश्वर पोलिसांची कारवाई

**दि९ विदर्भ प्रजासत्ताक नांदगाव खंडेश्वर**

ग्रामिण भागातून शासनाच्या बंदीनंतरही गोवंशाची अवैधरीत्या कत्तलीसाठी वाहतूक सुरूच आहे. नांदगावखंडेश्वर पोलिसांनी जनावरांचा ट्रक पकडला. त्यातील २३ गोवंशाचे प्राण वाचविण्यात पोलिसांना यश आले.



तळेगाव ठाकूर कडून एक ट्रकमध्ये गोवंशाची वाहतूक सुरू असल्याच्या माहितीनंतर पोलिसांनी शिंगणापूरकडे जाणाऱ्या मार्गावर पाळत ठेवली. मध्यरात्रीनंतर सव्वा वाजताच्या सुमारास नाकाबंदी केली. ट्रक काही दूर अंतरावर थांबवून, त्यातील व्यक्ती पसार झाले. पोलिसांनी ट्रकची तपासणी केली असता, त्यामध्ये कप्पे करून गोवंशाना बळजबरीने कोंबलेले आढळले पोलिसांनी गो व बैलांना सुखरूप खाली उतरवून, नजीकच्या गोरक्षण संस्थेमध्ये पाठविण्यात आले. पोलिसांनी एमएच ४० वाय ९०६१ क्रमांकाचा ट्रक जप्तअसा एकूण ३१ लाख ७५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी नांदगावखंडेश्वर पोलिसांनी गुन्हा दाखल करून पसार संशयिताचा शोध सुरू केला होता. उपविभागीय पोलिस अधिकारी सूर्यकांत जगदाळे, ठाणेदार विशाल पोळकर यांच्या मार्गदर्शनात उपनिरीक्षक दर्शन दिकोंडवार, सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक विष्णुपंत तीरमारे, अमरदीप वासनकर, अजहर खान, राहुल गजभिये, संजय ढोके, यांच्या पथकाने ही कारवाई केली.

# भातकुली तालुका कृषी सल्लागार समिती, 'आत्मा' चे अध्यक्षपदी हरिभाऊ मोहोड व उपाध्यक्षपदी सौ. पौर्णिमाताई सवाई

**दि.९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**



नुकत्याच शासन नियुक्त, समिती सदस्यांची, तालुका कृषी अधिकारी, भातकुली येथील कार्यालयात आयोजित आज, पहिल्या सभेमध्ये भातकुली तालुका कृषी सल्लागार समिती,'आत्मा' चे अध्यक्षपदी हरिभाऊ मोहोड व ऊपाध्यक्षपदी सौ. पौर्णिमाताई सवाई यांची ऐकमतांनी निवड करण्यात आली. यावेळी समिती सदस्य राजेश बंड, भूषण पाटील, राहूल ठाकरे, संजय हरणे, अतुल मोडक, संजय सगणे, विनोद अघम, राजेश हरणे, ऐकनाथ कूचे,सदस्या सौ अर्चनाताई सवाई, सौ.वंदनाताई सवाई, तालुका कृषि अधिकारी श्री. खरसाण, मंडल कृषी अधिकारी श्री. सराळ, सौ. वाटाणे मॅडम, कृषि सहाय्यक श्री खोबरखेडे, राहुल देशमुख आदी उपस्थित होते.

# विद्यार्थीनींनी प्रत्येक क्षेत्रात स्वत:ला सिद्ध करावे : प्रा.डॉ.प्रवीण गुल्हाने

**दि.९ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

नूतन विदर्भ शिक्षण मंडळ संचालित महिला महाविद्यालय येथे नुकताच सरस्वती पूजन कार्यक्रम २०२४ संपन्न झाला.नवीन वर्षाला सुरुवात करीत असताना गुरू -शिष्य परंपरेनुसार आवश्यक ते ज्ञानाचे,वागणुकीचे,जगण्याचे वाण शिक्षक विद्यार्थिनींना देतात,विद्यार्थिनी सुद्धा चंगळवादी दुनियेत हरवून न जाता चांगल्या मार्गांची कास धरण्याचा संकल्प करतात.महाविद्यालयाने स्थापन झाल्या पासूनच विद्यार्थिनींच्या बौद्धिक, शैक्षणिक, भावनिक, सामाजिक स्तराचे उन्नयन करण्याचा विडा उचललेला असून संस्कृती, परंपरा जपण्याचा प्रयत्न सातत्याने केल्या जातो.याचाच परिपाक म्हणजे दरवर्षी महाविद्यालय सरस्वती पूजन कार्यक्रम आयोजित करते,यात विद्यार्थिनी पारंपारिक पोशाख परिधान करून अत्यंत उल्हासाने संमिलित होतात.सरस्वती मातेचे पूजन करून ,आणि गुरुजनांचे आशीर्वाद घेवून नव्या वर्षाच्या नव सूर्याची ऊर्जा,तेज घेण्याचा प्रयत्न करतात. चांगले जीवन व्यतित करण्याचा,खूप प्रगती करण्याचा संकल्प करतात.या वर्षी संपन्न झालेल्या कार्यक्रमात विद्यार्थीनींनी आपले मनोगत व्यक्त करून शिक्षकांना प्रगतीचा आलेख उंचावत नेण्याबाबत आश्र्वस्त केले तर शिक्षकांनी ही मुलींना मार्गदर्शन केले.याप्रसंगी प्रा.अश्विनी पिंपळकर यांनी जीवनात नियोजन आखणे,धेय्य ठरवणे हे किती महत्वाचे असते ,शैक्षणिक प्रगती साधण्यासाठी कोणते मार्ग निवडावे याबाबत सुंदर विवेचन केले.प्रा.दीपक



चौधरी यांनी जीवनात यशस्वी होण्यासाठी स्वतःमध्ये बदल घडवून आणावे लागतात हे सांगत असतानाच महाविद्यालयीन शिक्षक आपल्या पाल्या प्रमाणे विद्यार्थिनींना वागणूक देतात हे सांगितले तसेच जीवनाचा खडतर प्रवास यशस्वी होण्याच्या अर्थाचे सुंदर गीत सादर केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ.प्रवीण गुल्हाने होते.त्यांनी जीवन जगण्याची दशसुत्री विद्यार्थिनींसमोर मांडत असताना यश अपयश,चढ उतार,सुख दुःख यांना सामोरे जातांना स्वतःला कसे खंबीर बनवीत जावे याचे अत्यंत महत्वाचे प्रतिपादन केले. थोडासा आळस,थोडेसे दुर्लक्ष जीवनात कसे नुकसान निर्माण करते,आयुष्य संकटात टाकते याबद्दल विविध दाखले देत भाष्य केले.मुलींनी आपण कमी आहोत ही भावना न ठेवता स्वत:ला प्रत्येक क्षेत्रात सिद्ध करावे असे आवाहन केले.आपल्या शिक्षणाचा उपयोग स्वतःसोबत च आईवडील,कुटुंब आणि समाजाच्या हितासाठी करावा असे प्रतिपादन सरांनी केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ.अरुणा वाडेकर यांनी विशद करताना परंपरागत पद्धतीने नव वर्ष साजरे करण्यामागचा उद्देश स्पष्ट केला.आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करीत असतानाच आपली संस्कृती जतन करण्याचा प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.नूतन विदर्भ शिक्षण मंडळ ही संस्था व महिला महाविद्यालय यांच्या सामाजिक वस्याचाच हा भाग आहे हे त्यांनी अधोरेखित केले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन व आभारप्रदर्शन प्रा.डॉ.अरुणा वाडेकर यांनी केले.महाविद्यालयाचे प्राचार्य माननीय डॉ.अविनाश मोहरील यांच्या नियोजन व मार्गदर्शनाने सरस्वती पूजन सोहळा यशस्वी रीतीने संपन्न झाला.विद्यार्थिनी व शिक्षक यामध्ये उत्तम संवाद , बंध निर्माण करणारा हा कार्यक्रम महाविद्यालयाचे वैशिष्ट्य आहे. सदर कार्यक्रमाला प्राध्यापक व विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होत्या.

# घराघरात भाजपला पोहोचविण्यासाठी काम करा : आमदार प्रवीण पोटे

## शहर कार्यकारिणीची आढावा बैठक



**दि.९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

भारतीय जनता पक्षाने मागील १० वर्षात केंद्र आणि राज्य सरकारमध्ये जी कामगिरी केली आहे त्यातून सर्व सामान्य माणसाचे जीवनमान उंचावले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून अनेक कल्याणकारी योजनांमुळे देशातील गोर गरिबांचे कल्याण झालेला आहे. त्यामुळे येणाऱ्या निवडणुकीत पुन्हा एकदा हेच सरकार लोकांना हवे असून आता घराघरात भाजपचे काम पोहोचविण्यासाठी आपल्याला काम करायचे आहे अशी सूचना आमदार प्रवीण पोटे पाटील यांनी शहर कार्यकारिणीच्या पदाधिकाऱ्यांना दिल्या आहेत. अमरावती शहर कार्यकारिणीची बैठक नुकतीच शहर कार्यालयात पार पडली. यावेळी पोटे यांनी विद्यमान कार्यकारिणीच्या कामांचा आढावा घेत असताना अनेक महत्त्वपूर्ण सूचना दिल्या. यावेळी बैठकीला यावेळी जयंत डेहनकर, तुषार भारतीय, दिनेश सूर्यवंशी, रवींद्र खांडेकर, विवेक कलोती, कौशिक अग्रवाल, गंगाताई खारकर, चेतन गावंडे, अनितताई राज, सुनील काळे आदींसह कार्यकरिणीतील सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

देशात आणि राज्यात पुन्हा एकदा भाजपचे सरकार येण्यासाठी तळागाळातील प्रत्येक कार्यकर्त्याला मेहनत घ्यावी लागणार आहे. भाजपने देशातील भ्रष्टाचार कमी करून प्रत्येक गोर गरिबाच्या कल्याणाचा विचार डोळ्यापुढे ठेवूनच काम केले आहे. देशातील लाखो शेतकरी, कामगार, कर्मचारी यांच्या उत्थानासाठी मोठे काम झालेले आहे. शासकीय योजनांमुळे सर्वसामान्यांचे जीवन सुकर झाले आहे. देशातील गुंडांचे राज्य संपून राम राज्य आले आहे. त्यामुळे आता प्रत्येक घरात भाजपचे कार्य पोहोचविण्यासाठी आपल्याला काम करायचे आहे असे पोटे यांनी यावेळी सांगितले. या बैठकीत सर्व पदाधिकाऱ्यांनी केलेल्या कामाचा आढावा घेत असताना पुढील काळातील निवडणुका लक्षात घेऊन कामाला वेग देण्याच्या सूचना आमदार पोटे यांनी दिल्या. बूथ पातळीवर काम करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या नेमणुका करून घराघरात पोहोचण्यासाठी नियोजन करण्याचे आदेश यावेळी पोटे यांनी दिले. 'घर घर मोदी' ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी प्रत्येकाने जिकरिने काम करावे असे पोटे यांनी यावेळी सांगितले.

# मधमाशा पालन करा अन् व्हा मालामाल; अर्ज केला का?

## पर्यायी व्यवसाय म्हणून करावी निवड : मधमाशा पालन व्यवसाय फायद्याचे

**अरुण जोशी**

**दि९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**



खादी व ग्रामोद्योग मंडळामार्फत मध केंद्र योजना राबविण्यात येते. यासाठी शेतकरी, सुशिक्षित बेरोजगार आणि संस्थांना अर्ज करता येतो. आज- काल शेतकरी मोठ्या प्रमाणात पिकांच्या नुकसानाने त्रस्त आहे. अवकाळी पाऊस, तर कधी कधी रोगाने पिकांचे मोठे नुकसान होत आहे. त्यामुळे शेतीला आता जोडधंदा म्हणून एखादी व्यवसाय करणे गरजेचे आहे. त्यामुळे आता जिल्हा उद्योग केंद्राच्या जिल्हा ग्रामोद्योग कार्यालयात या योजनेविषयी माहिती नागरिकांना मिळते.मधमाशा पालन व्यवसाय करायचा असेल तर, तुम्ही मधमाशा पालन योजनेंतर्गत व्यवसाय करता येऊ शकतो. यासाठी शुल्क खर्च करून आणि त्याचबरोबर कमी जागते या व्यवसायाची सुरवात करता येते. मधमाशा पालनासाठी राज्य शासनातर्फे अनुदानही दिले जाते. हा व्यवसाय सुरू केल्यानंतर काही महिन्यांतच उत्पन्न सुरू होते. या उद्योगामुळे तोट्यात जाणारी शेती जर नफ्यात आणायची असेल तर शेतकऱ्यांनी शेतीमध्ये बदल केला पाहिजे.

**नागरिकांनो योजनेचा लाभ घ्या**

सध्या शेतीत अनेक शेतकऱ्यांच्या पिकाचे अवकाळी पाऊस तसे रोगराईने पिकाचे नुकसान होत आहे. लावलेल्या पिकातून उत्पन्न होणार की नाही याचीही शाश्वती सध्या राहत नसल्याने सध्या शेतीचा व्यवसायासोबत जोडव्यवसाय म्हणून पर्यायी या योजनेचा लाभ घेता येऊ शकतो. जास्तीत जास्त नागरिकांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा ग्रामोद्योग विभागाने केले आहे.या योजनेसाठी शेतकरी,सुशिक्षित बेरोजगार,संस्था यांना अर्ज करता येतो.

**अर्ज कोठे करणार?**

राज्य शासनाने दुष्काळग्रस्त गावांमध्ये जागतिक बँकेच्या आर्थिक साहाय्याने कृषी संजीवनी योजना प्रकल्प राबविल्यास मान्यता दिली आहे. या अंतर्गत अर्ज करता येतो. यासाठी ऑनलाइन किवा ऑफलाइन जिल्हा ग्रामोद्योग कार्यालयात करता येतो.

**निकष काय?**

अल्पभूधारक शेतकऱ्यांतील अनुसूचित जाती, आदिवासी महिला अपंग व सामान्य शेतकरी यांना प्राधान्य दिले जाऊ शकते.एका कुटुंबातील एकाच व्यक्तीला या योजनेचा लाभ दिला जाणार असल्याचे सांगण्यात आलेले आहे.

**मधमाशा पालनासाठी ५०टक्के अनुदान**

मधपेटी ही शेती पिके व फळ बागायतीच्या ठिकाणी किंवा जंगलामध्ये ठेवल्यास मधमाशाद्वारे परागीकरण होऊन पिकाच्या उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ होते. मधमाशी परागीकरणामुळे पिकानुसार व पिकांच्या प्रकारानुसार वाढ होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. ही वाढ उत्पादित केलेल्या मधाच्या व मेणाच्या किमतीच्या १० ते १५ टक्के अधिक असते. मधमाशा पालनासाठी सर्वांना किमान ५० टक्क्यांपर्यंत अनुदान मिळू शकते.

# ग्रामपंचायती होताहेत डिजीटल क्यूआर कोड स्कॅन करून भरता येणार कर

## वेळ व पैशांची होणार बचत; पारदर्शकता येण्यास मदत

**दि.९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

ग्रामपंचायतीमार्फत दिली जाणारी विविध प्रमाणपत्रे, दाखले घरबसल्या ऑनलाइन काढता येणार आहेत. तसेच विविध करांचा भरणाही घरबसल्या करता येणार असून, यासाठी ग्रामपंचायतींना क्यूआर कोड उपलब्ध करून दिले जात आहेत. जिल्ह्यात आतापर्यंत जवळपास १०२ ग्रामपंचायती डिजिटल झाल्या आहेत.



शासकीय कागदपत्रे, योजनांचे अर्ज भरणे, विविध कर भरण्याचे काम सुलभ व पारदर्शक व्हावेत, यासाठी शासनाने ऑनलाइन व्यवहारावर भर दिला आहे. ग्रामपंचायतीही ऑनलाइन करण्याचा प्रयत्न शासन करीत आहे त्या अनुषंगाने ग्रामस्थांनाही आता घरबसल्या ग्रामपंचायत स्तरावरील विविध दाखले काढता येणार आहेत. यासाठी महा-ई- ग्राम सिटीजन ॲप विकसित केले आहे. तसेच ग्रा.पं.ना क्यूआर कोड उपलब्ध करून दिला जात असून, यावर ग्रामस्थांना घरबसल्या करांचा भरणा करता येत आहे.जिल्ह्यातील ग्रामपंचायती डिजिटल करण्याच्या कामाला गती आली आहे. लवकरच सर्व ग्रामपंचायती डिजिटल होऊन ऑनलाइन व्यवहार सुरू होतील.या माध्यमातून विविध करांचा भरणाही करता येणार आहे. तसेच जवळपास १० लाखांपर्यंतचे व्यवहार करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्याचे नियोजन आहे.

**डिझिटल ग्रामपंचायत म्हणजे काय ?**

ग्रामपंचायतीचे सर्व व्यवहार ऑनलाइन होणार आहेत. विविध करांचा भरणा रोखीने न करता ऑनलाईन पद्धतीने होणार आहेत.

# जिल्हा परिषद अधिकारी व कर्मचारी क्रिडा महोत्सव ११ ते १३ जानेवारीला

## अमरावती जिल्हा परिषदेचे आयोजन : १६ संघाचा राहणार सहभाग; जिल्हातील तिन हजार अधिकारी,कर्मचारी होणार सहभागी

**दि.९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

दैंनदिन सततच्या कामाचा ताणतनाव कमी व्हावा या करीता दरवर्षी अमरावती जि.प,अधिकारी व कर्मचारी क्रिडा आणि सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करते.या वर्षाला सुध्दा श्री.हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ अमरावती येथे ११ ते १३ जानेवारीला संपन्न होणार आहे.यात जिल्ह्यातील १६ संघ सहभागी होणार असुन तिन हजार अधिकारी,कर्मचारी सहभागी होणार आहे.सांघिक व वैयक्तीक स्पर्धा आणि सांस्कृतिक कार्यक्रमाची मेजवानी असणार आहे अशी माहीती क्रिडा महोत्सवाचे सचिव डॉ.कैलास घोडके,उपसचिव प्रफुल्ल कचवे,क्रिडा संयोजक डॉ.नितिन उंडे यांनी दिल्याचे प्रसिध्दी विभागाने कळविले आहे.




या तिन दिवसीय जिल्हा परिषद अधिकारी व कर्मचारी क्रिडा व सांस्कृतिक महोत्सवाचे उदघाटन गुरुवार दि.११जानेवारीला सकाळी १० वाजता अमरावतीचे जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्या हस्ते होणार आहे.या कार्यक्रमाचे अध्यक्ष अमरावती जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी अविशांत पंडा हे भूषावतील.तर याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष जोशी,मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी चंद्रशेखर खंडारे,प्रकल्प संचालक प्रिती देशमुख,उप मुख्य कार्यकारी अधिकारी बी.टी.बायस,श्रीराम कुळकर्णी सह सर्व खाते प्रमुख,गटविकास अधिकारी उपस्थित राहणार आहे.१४ तालुका संघ,१ मुख्यालय व १अधिकारी वर्ग असे १६ संघ सहभागी होणार आहे.यात ५७ प्रकारच्या खेळांचा समावेश करण्यात आला असून सांस्कृतिक कार्यक्रमात ९ प्रकारचे कार्यक्रम सादर करण्यात येणार आहे.असे क्रिडा महोत्सवाचे प्रसिध्दी समितीचे राजेश सावरकर, शकील अहमद, विनायक लकडे यांनी कळविले आहे.सांघिक व वैयक्तीक स्पर्धा मध्ये क्रिकेट, फुटबॉल, व्हॉलीबॉल, कबड्डी, खो-खो, टेनिक्काईट, बॅडमिटन, टेबल टेनिस, कॅरम, बुध्दीबळ, जलतरण, धावणे, भालाफेक, गोळाफेक ,थाळीफेक, लांब उडी,उंच उडी महीला व पुरूष खेळाडू सहभागी होणार आहे.

**१३जानेवारीला होणार समारोह**

सांस्कतिक कार्यक्रमा मध्ये भक्तीगीत, भावगीत, लोकगीत, सिनेगीत,करावके गीत,समुह गीत,एकल गीत, युगलगीत, अभिनय, झाँकी याचा समावेश असुन ११जानेवारीला सायंकाळी ६ वाजता अंजनगाव सुर्जी, मोर्शी, अधिकारी वर्ग, चांदुर रेल्वे, दर्यापूर, चिखलदरा,धामणगाव रेल्वे,नांदगाव खंडे.यांचा तर १२ जानेवारीला तिवसा, भातकुली, धारणी, अचलपूर, मुख्यालय,अमरावती,चांदुर बाजार,वरुड हे सांस्कृतिक कार्यक्रम सादर करणार आहे.या तिन दिवसीय क्रिडा महोत्सवाचा समारोप १३जानेवारीला दुपारी ३ वाजता होणार आहे.जिल्हा परिषद अधिकारी व कर्मचारी क्रिडा महोत्सवातदिव्यांग अधिकारी व कर्मचारी खेळाडू यांना सहभाग नोंदविता यावा,यासाठी प्रथमच दिव्यांग खेळाडू करिता वेगळा गट तयार करून खेळ प्रकार घेण्यात येणार आहे.

# देशाच्या विविध भागांत आज मुसळधार पावसाचा अंदाज



**दि.९विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

बंगालच्या उपसागरावर बाष्पयुक्त वारे जमा झाल्यामुळे बुधवारपर्यंत पाऊस पाठ सोडण्याची शक्यता कमी आहे. दरम्यान, भारतीय हवामान खात्याने वर्तवलेल्या अंदाजानुसार येत्या २४ तासांत देशातील विविध भागांत मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

तमिळनाडूच्या किनारपट्टीसह मध्य महाराष्ट्र, राजस्थान, केरळ, पश्चिम मध्यप्रदेश, पूर्व राजस्थान दक्षिण कर्नाटक, लक्षद्वीप या भागात मुसळधार पावसाची शक्यता आहे. वेस्टर्न डिस्टर्बन्समुळे उत्तर भारत व लगतच्या भागात पावसाची शक्यता आहे. मंगळवार नऊ जानेवारीला महाराष्ट्र आणि गुजरातमध्ये काही ठिकाणी गडगडाट आणि विजांच्या कडकडाटासह हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे.

विदर्भ आणि मराठवाड्यासह कोकण, गोवा, पूर्व मध्यप्रदेश, गुजरात, उत्तरप्रदेश, दिल्ली, चंदीगड, पंजाब, हरियाणा, उत्तराखंड, जम्मू काश्मीर, लडाख, पश्चिम राजस्थान या भागांत ढगांच्या गडगडाटासह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. आंध्र प्रदेशात प्रदेशचा किनारी भाग तसेच छत्तीसगड, तेलंगणा या राज्यांतदेखील पावसाच्या हलक्या सरी कोसळण्याची शक्यता आहे.

# स्व. दत्तात्रय पुसतकर स्मृती वादविवाद स्पर्धा उत्साहात संपन्न : कु.वैष्णवी सानप ठरली पहिल्या पारितोषिकाची मानकरी

**दि.९विदर्भ प्रजासत्ताक नांदगाव पेठ**

येथील स्व. दत्तात्रय पुसदकर कला महाविद्यालयात महाविद्यालयाचे श्रद्धास्थान स्व. दत्तात्रय पुसतकर यांच्या स्मृती प्रित्यर्थ सोशल मीडियाचा अतिरेकी वापर मानवी हितासाठी घातक ठरत आहे या विषयावर विदर्भस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेचे आयोजन ८ जानेवारी २०२४ रोजी करण्यात आले होते. या वादविवाद स्पर्धेत श्री शिवाजी शिक्षण महाविद्यालय अमरावती येथील विद्यार्थिनी कुमारी वैष्णवी सानप हिने प्रथम पारितोषिक पटकाविले. महाविद्यालयातर्फे आयोजित विदर्भस्तरीय आंतरमहाविद्यालयन वादविवाद स्पर्धेच्या सुरुवातीला श्रद्धेय दत्तात्रेय पुसतकर यांच्या पुण्यतिथीचा कार्यक्रम साजरा करण्यात आला. याप्रसंगी त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या कार्यक्रमाला स्व. दत्तात्रय पुसतकर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्रीमती वृषालीताई पुसतकर,उपाध्यक्ष निदानभाऊ बारस्कर,सचिव श्रीकृष्णजी बाळापुरे,कोषाध्यक्ष ज्ञानेश्वर हिवसे, सदस्य रेवण पुसतकर, प्राचार्य विजय दरणे इत्यादी मान्यवर उपस्थित होते. त्यानंतर वादविवाद स्पर्धेच्या उद्घाटनाचा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मा. श्रीकृष्णजी बाळापुरे हे होते.महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय दरणे यांनी वादविवाद स्पर्धेच्या आयोजना मागची भूमिका प्रास्ताविकातून विशद करीत वादविवाद स्पर्धेचे अध्यक्ष, परीक्षक, सर्व स्पर्धक आणि उपस्थितांचे स्वागत केले. या वादविवाद स्पर्धेत विदर्भातील विविध महाविद्यालयातील एकूण ३२ स्पर्धक सहभागी झालेत. सर्व स्पर्धकांनी अत्यंत चांगल्या पद्धतीने स्पर्धेत आपले मत मांडले. या स्पर्धेत कु. वैष्णवी सानप, श्री. शिवाजी शिक्षण महाविद्यालय अमरावती यांनी प्रथम पारितोषिक रु.२००१/-, कु. अंजली इंगळे, विद्याभारती महाविद्यालय अमरावती यांनी द्वितीय पारितोषिक रु.१५०१/-, श्री. अमन वानखडे, श्री. शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय अमरावती यांनी तृतीय पारितोषिक रु.१००१/-आणि कु. अनुसया सरगर ,महिला महाविद्यालय अमरावती यांनी प्रोत्साहनपर पारितोषिक रू.५०१/- पटकाविले. वादविवाद स्पर्धेचे अध्यक्षस्थानी श्री.श्रीकृष्णजी बाळापुरे हे होते. या स्पर्धेचे अचूक परीक्षण डॉ.अनुप नांदगावकर इण्णांनी महाविद्यालय कारंजा लाड, डॉ. संजय रेड्डी, के .एल. कॉलेज अमरावती आणि डॉ. अंजली वाट, तक्षशिला महाविद्यालय अमरावती या मान्यवरांनी केले. या स्पर्धेच्या उद्घाटन व बक्षीस वितरण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सौ. सुनीता बाळापुरे यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ .गोविंद तिरमनवार यांनी केले. स्पर्धेच्या बक्षीस वितरण कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य देवेंद्र ठाकरे उपस्थित होते.सोबतच या कार्यक्रमाला नांदगाव पेठ येथील पत्रकार दिनकर सुंदरकर, श्री नागापुरे आणि मंगरूळ पीर येथील श्री. शंकर जाधव यांची विशेष उपस्थिती होती. सदर वादविवाद स्पर्धा यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय दरणे,वादविवाद स्पर्धेचे समन्वयक डॉ. पी.आर. जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयातील प्रा. राजेश ब्राह्मणे, डॉ. श्रीकांत माहुलकर डॉ.विकास अडलोक, डॉ. सुभाष पवार, डॉ. पंकज मोरे, ज्ञानेश्वर बारस्कर, रेखा पुसतकर, विनायक पावडे, दिलीप पारवे, राहुल पांडे, अनिल शेवतकर, निलेश सरवटकर आणि सर्व विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

